रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ९
www.ramprahar.com
बुधवार, २६ जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

मालमत्ता कर पुनर्निरीक्षण मोहिमेला मोठा प्रतिसाद/२
महाडमधील पारमाची गाव पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत/५
दुसरी कसोटी अनिर्णित; भारताने मालिका जिंकली/८

## कोल्हापूरमध्ये भिंत कोसळून महिलेचा मृत्यू



**कोल्हापूर** : मुसळधार पावसात अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या घटना घडत आहेत. कोल्हापुरात मुसळधार पावसामुळे केशवराव नाट्यगृह भोसले आणि खासबाग मैदानाची असलेली सामायिक भिंत मंगळवारी (दि. २५) संध्याकाळच्या सुमारास अचानक कोसळली. केशवराव भोसले नाट्यगृह येथे काही महिला कार्यक्रमासाठी आल्या होत्या. ही भिंत येथील निर्माणाधीन शौचालयावर पडली. त्यामुळे आत असणाऱ्या दोन महिला भिंतीच्या ढिगाऱ्याखाली अडकल्या. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे अधिकारी तसेच डॉक्टर घटनास्थळी दाखल झाले आणि तातडीने बचावकार्य सुरू झाले. त्यानंतर काही वेळातच या महिलांना बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले. यातील अश्विनी आनंदा यादव (वय ५९) या महिलेचा मृत्यू झाला, तर संध्या तेली (वय २८) यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# राज्यात पावसाचा जोर कायम

### ■ रायगडला सलग दोन दिवस रेड अलर्ट

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकणासह राज्यात सध्या अनेक भागांमध्ये जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. अशातच रायगड जिल्ह्याला सलग दोन दिवस रेड अलर्ट जारी करण्यात आला असून पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.

गेल्याच आठवड्यात कोकणात अतिवृष्टी झाली. १८ जुलैला ढगफुटीसदृश पाऊस पडला होता. यामध्ये रायगडातील खालापूर तालुक्यामधील इर्शाळवाडीत



दरड कोसळून मोठी जीवित व वित्त हानी झाली. तेव्हापासून सुरू असलेला पाऊस सातत्याने पडत आहे. रायगडला २५ व २६ जुलै असे दोन रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. अन्य जिल्ह्यांनाही रेड, ऑरेंज अलर्ट देण्यात आले आहे. दरम्यान, महाडमधील रायगड रस्त्यावर मंगळवारी पाणी साचले होते. त्यातून वाट काढताना वाहनचालक आणि पादचाऱ्यांना कसरत करावी लागली.

### बंगालच्या उपसागरात घोंगावतेय चक्रीवादळ

**नवी दिल्ली** : देशात काही राज्यांमध्ये जोरदार पाऊस सुरू आहे. आता मान्सून पुढील चार दिवस तीव्र असणार आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ निर्माण झाले असून यामुळे महाराष्ट्रासह १२ राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात समुद्रसपाटीपासून ५.८ ते ७.६ किमी उंचीवर हे वादळ असून २४ तासांत तेथे कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे.

# जल जीवन मिशन नळ पाणीपुरवठा योजनांचा लाभ सर्व घटकांना मिळावा

## आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी यांनी वेधले लक्ष

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांचा लाभ सर्व घटकांना मिळण्यासाठी आणि त्याची यशस्वी अंमलबजावणी होण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून या विषयावर शासनाचे लक्ष केंद्रित केले.

राज्यात विशेषत: रायगड जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांची बहुतांश कामे वन विभागाच्या हद्दीत येत असून त्यांच्याकडून ना हरकत दाखला मिळत नसल्यामुळे अनेक गावे,




वाड्या-वस्त्या नळ पाणीपुरवठा योजनेपासून वंचित रहावे लागू शकते. त्यामुळे या प्रकरणी शासनाने चौकशी करून जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांचा लाभ तळागाळातील प्रत्येक घटकाला मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, अशीही विचारणा या तारांकित प्रश्नातून करण्यात आली होती.

या प्रश्नावर पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले की, केंद्र शासनामार्फतच्या जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत एकूण १४२२ आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत एकूण ३१ योजना अशा एकूण १४५३ योजना राबविण्यात येत आहेत. त्यापैकी जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या ५४ योजना व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या दोन योजना अशी एकूण ५६ योजनांची कामे वन विभागाच्या हद्दीत येतात. **(पान २ वर..)**

# भाजप पदाधिकाऱ्यांची पुण्यात बैठक

## मान्यवरांकडून मार्गदर्शन; धैर्यशील पाटील यांचा सत्कार

**पुणे : प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने कंबर कसली असून लोकसभा प्रवास दौरा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर रायगड, बारामती, शिर्डी आणि शिरूर लोकसभा मतदारसंघांतील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक मंगळवारी (दि. २५) पुण्यात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा माजी मंत्री विनोद तावडे आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मार्गदर्शन केले.




पुण्यातील भांडारकर इन्स्टिट्युटमध्ये झालेल्या या बैठकीस भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी आमदार बाळा भेगडे यांच्यासह लोकसभा व विधानसभा प्रभारी, संयोजक, निवडणूक प्रमुख, विस्तारक तसेच भाजप जिल्हा अध्यक्ष उपस्थित होते. या बैठकीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करून पक्ष अधिक मजबूत करण्याबाबत सूचना देण्यात आली.

भाजपच्या दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्षपदी पेणचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा या वेळी पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा माजी मंत्री विनोद तावडे आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.



## ज्येष्ठ पत्रकार, लेखक शिरीष कणेकर यांचे निधन

**मुंबई** : ज्येष्ठ पत्रकार, लेखक शिरीष कणेकर यांचे वयाच्या ८०व्या वर्षी निधन झाले. प्रकृती खालावल्यामुळे मंगळवारी (दि. २५) त्यांना हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. हृदयविकाराच्या धक्क्याने त्यांचे निधन झाले. रायगड जिल्ह्यातील पेण हे कणेकर यांचे मूळ गाव. मुंबईत त्यांची जडणघडण झाली.

# केवळ इंडिया नाव ठेवल्याने होत नाही!

## पंतप्रधान मोदींचा विरोधकांवर हल्लाबोल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात मणिपूर मुद्द्यावरून विरोधकांचा गदारोळ सुरू आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि. २५) भाजपच्या संसदीय पक्षाची बैठक पार पडली. या वेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांच्या आघाडीवर मोठा हल्ला चढवला.



बंगळुरूमध्ये १८ आणि १९ जुलैला झालेल्या बैठकीत विरोधकांनी आपल्या आघाडीचे नाव जाहीर केले ते म्हणजे इंडियन नॅशनल डेमॉक्रेटीक इन्क्ल्युसिव्ह अलायन्स अर्थात 'इंडिया'. याला मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जोरदार प्रत्युत्तर दिले. केवळ इंडिया नाव ठेवल्याने होत नाही. ईस्ट इंडिया कंपनीनेही इंडिया लावले होते आणि इंडियन मुजाहिदीनच्या नावातही इंडिया आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

विरोधक विखुरलेले आहेत. हताश आहेत. त्यांना आणखी बराच काळ सत्तेत येण्याची इच्छा नाही, असे त्यांचा दृष्टिकोन पाहता दिसते, असा टोलाही पंतप्रधानांनी लगावला.

## निवडक

### पुणे, सातारा, कोल्हापूरच्या जंगलात बॉम्बस्फोटाची चाचणी

**पुणे :** कोथरूडमधून अटक करण्यात आलेल्या दोन दहशतवाद्यांनी पुणे, सातारा, कोल्हापूरच्या जंगलात बॉम्बस्फोटाची चाचणी केल्याची माहिती दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) न्यायालयास दिली. या आरोपींवर दाखल गुन्ह्यात बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यान्वये (युएपीए) कलमवाढ करण्यात आली आहे तसेच ५ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### क्रिकेटपटू हरमनप्रीत कौरवर आयसीसीची कडक कारवाई

**नवी दिल्ली** : बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात मैदानामध्ये राडा करून आचारसंहितेचे उल्लंघन करणारी भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनमीत कौरवर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) मोठी कारवाई केली आहे. तिला पुढील दोन आंतरराष्ट्रीय सामन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहे.

# मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहात महिला सुरक्षा रक्षक नेमणार

## राज्य सरकारकडून विधानसभेत घोषणा



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शासकीय मुलींच्या वसतिगृहात महिला सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यासंदर्भात लवकर निर्णय घेण्यात येईल, असे मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानसभेत सांगितले.

बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहात सोयी-सुविधा पुरविण्याबाबत विधानसभा सदस्य आकाश फुंडकर, बळवंत वानखडे, राम कदम, यशोमती ठाकूर, नितीन राऊत यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

मंत्री देसाई म्हणाले की, खामगाव येथील मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहात सोयीसुविधा पुरविण्यात येत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीनुसार यास जबाबदार असलेल्या गृहपालाच्या पदाचा कार्यभार काढण्यात आला असून संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

राज्यातील मुलींच्या वसतिगृहाच्या इमारती आणि जागेसंदर्भात अनेक लोकप्रतिनिधींकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याशी समन्वय साधून मुलींच्या वसतिगृहाच्या सुरक्षा आणि सोयीसुविधासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री देसाई यांनी या वेळी सांगितले.

# भाजप नेते स्व. मेघनाथ म्हात्रे यांच्या स्मृतीदिनानिमित्त जासईत रक्तदान शिबिर

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिवादन





**उरण : रामप्रहर वृत्त**

प्रकल्पग्रस्तांचे नेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला मिळावे यासाठी उभारण्यात आलेल्या आंदोलनात सक्रिय सहभाग राहिलेले भाजपचे उमदे नेतृत्व स्व. मेघनाथ म्हात्रे यांच्या द्वितीय पुण्यस्मरणनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंगळवारी (दि. २५) जासई येथे जाऊन अभिवादन केले आणि रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले.

मेघनाथशेठ प्रतिष्ठान व भूषण म्हात्रे यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्व. मेघनाथ म्हात्रे यांच्या स्मृतींना उजाळा मिळेल असे कायमस्वरूपी नियोजन करण्यासाठी येत्या गणेशोत्सनंतर बैठक घेणार आहोत, असे सांगितले.

या शिबिराला बळीशेठ घरत, राजेंद्र म्हात्रे, प्रवीण म्हात्रे, धर्मदास घरत, प्रकाश म्हात्रे, शिरीष म्हात्रे, जयवंत म्हात्रे, रणजीत पाटील, भुषण म्हात्रे, यश म्हात्रे, गुरूनाथ म्हात्रे, जयदीप, सुनील पाटील, श्रीकांत म्हात्रे, प्रशांत म्हात्रे, वैष्णव म्हात्रे, जय म्हात्रे आदी उपस्थित होते.


# चांद्रयान 3 मोहिमेतील महत्त्वाचा टप्पा पार

### पृथ्वीच्या कक्षेतून चंद्राच्या दिशेने प्रवास सुरू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चांद्रयान ३ मोहिमेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा अखेर पार पडला आहे. पृथ्वीच्या कक्षेतून बाहेर पडून या यानाचा थेट चंद्राच्या दिशेने प्रवास सुरू झाला आहे. चांद्रयान ३ आतापर्यंत पृथ्वीच्या दीर्घ वर्तुळाकार कक्षेत प्रदक्षिणा घालत होते. आता यान पृथ्वी आणि चंद्राच्या मध्ये असलेल्या कक्षेतून सरळ चंद्राच्या दिशेने मार्गस्थ झाले आहे.

१ ऑगस्ट रोजी ट्रान्सलुनर इंजेक्शनच्या माध्यमातून चांद्रयान ३ हे चंद्राच्या कक्षेत आणण्याची प्रक्रिया केली जाणार आहे. यानंतर यान चंद्राला दीर्घ वर्तुळाकार कक्षेत प्रदक्षिणा घालत पुढे जाईल. चांद्रयान ३ अंतराळयानाने १२७६०९



किमी २३६ किमीची कक्षा गाठणे अपेक्षित आहे. निरीक्षणानंतर हा आकडा नेमका किती आहे ते स्पष्ट होईल. ३१ जुलैपर्यंत चांद्रयान ३ हे लाख किलोमीटरच्या कक्षेत नेण्याचे 'इस्रो'च्या शास्त्रज्ञांचे लक्ष्य आहे.

चांद्रयान ३ हे १४ जुलै २०२३ रोजी चंद्राकडे झेपावले आहे. चांद्रयानाच्या प्रक्षेपणानंतर सगळ्या गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडत आहेत. ५ ते ६ ऑगस्टदरम्यान यान चंद्राच्या कक्षेत प्रवेश करेल. २३-२४ ऑगस्टदरम्यान लँडर चंद्रावर उतरेल. ४२ दिवसांच्या प्रवासानंतर यान चंद्रावर पोहचेल. चंद्र १०० किमीच्या कक्षेत आल्यानंतर लँडर प्रोपल्शन मॉड्यूलपासून वेगळे केले जाईल आणि त्यानंतर लँडरचे चंद्रावर सॉफ्ट लँडिंग होईल. हा टप्पा अत्यंत आव्हानात्मक असणार आहे. विक्रम लँडरच्या यशस्वी लँडिंगनंतर म्हणजेच चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीरित्या उतरल्यानंतर प्रज्ञान रोव्हर त्यातून बाहेर येईल आणि चंद्राच्या पृष्ठभागावर फिरेल.

# राज्यस्तरीय गणेशोत्सव देखावा स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदा अधिक मास असल्याने गणेशोत्सव उशिराने येणार आहे, पण तयारी आतापासूनच सुरू झाली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यस्तरीय गणेशोत्सव स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी राज्य शासनाने स्पर्धेचे आयोजन केले आहे. विजेत्या मंडळांना लाखो रुपयांची बक्षिसे दिली जाणार आहेत.

१९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार आहेत. राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांना अनुक्रमे पाच, अडीच आणि एक लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार असून या स्पर्धेत अधिकाधिक मंडळांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.

**अशी होणार निवड**

स्थानिक पोलिसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक मंडळांना सहभागी होता येईल. स्पर्धेत पर्यावरणपूरक मूतीसाठी १० गुण, पर्यावरणपूरक सजावट १५ गुण, ध्वनीप्रदूषणरहित वातावरणासाठी ५ गुण, पाणी वाचवा, मुलगी वाचवा, अंधश्रद्धा निर्मूलन आदी समाजप्रबोधन, सामाजिक सलोख्यासंदर्भातील सजावट देखाव्यासाठी २० गुण, स्वातंत्र्य वा शिवराज्याभिषेक वर्षानिमित्ताने सजावट देखाव्यास २५ गुण असतील. रक्तदान शिबिर आदी सामाजिक कार्यासाठी २० गुण अशा १५० गुणांची ही स्पर्धा असणार आहे.

## माझी वसुंधरा अभियान

# पनवेलमध्ये शुक्रवारी विभागस्तरीय कार्यशाळा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान ४.०च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत मेरी माती मेरा देश अभियानाबाबत प्रशासकीय यंत्रणांना मार्गदशन देण्यासाठी कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली २८ जुलै रोजी सकाळी १०.३० वा. पनवेल येथील फडके नाट्यगृहात विभागस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.




निसर्गाशी असलेली कटिबद्धता वृद्धिंगत करण्यासाठी निसर्गाशी संबंधित भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या पंचतत्वांना विचारात घेऊन माझी वसुंधरा अभियान राज्यात २ ऑक्टोबर २०२०पासून राबविण्यात येत आहे. या अभियान ४.०चा शुभारंभ १५ जून २०२३ रोजी झाला असून या अभियानात विभागातील सर्व महानगरपालिका, नगर परिषदा, नगरपंचायती तसेच सर्व ग्रामपंचायतींनी विभागीय आयुक्तांच्या आवाहनाला प्रतिसाद देत सहभाग नोंदविला आहे. या अभियानांतर्गत स्थानिक संस्थांना काम करण्यासाठी मिळणारा कालावधी हा १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ असा १२ महिन्यांचा आहे.

माझी वसुंधरा अभियान ४.०ची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यशाळेस राज्यस्तरावरून माझी वसुंधरा अभियान संचालनालय, मुंबईतील पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे अभियान संचालक सुधाकर बोबडे मार्गदर्शन करणार आहेत तसेच उप वन संरक्षक (प्रादेशिक), सामाजिक वनीकरण विभाग, जिल्हा ठाणे व रायगड वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी करावयाची उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करतील.

या कार्यशाळेसाठी विभागस्तरावरून उपायुक्त उपस्थित तसेच क्षेत्रीय स्तरावरून कोकण विभागातील महापालिकेचे उपायुक्त, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जि.प., गटविकास अधिकारी, पं.स., नगरपालिका/नगरपंचायत मुख्याधिकारी व माझी वसुंधरा अभियानाचे जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय संपर्क अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# २० हजार निवृत्ती वेतनाचा निर्णय जारी करणार

## बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेच्या जाचक अटी शिथिल करणार

### मंत्री शंभूराज देसाई यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

विधान परिषदेत मंगळवारी (दि. २५) पत्रकारांच्या प्रश्नांसंदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. त्यावर मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघासह इतर पत्रकार संघटनांनी विधान परिषद सदस्यांना काही सूचना केल्या होत्या. त्यानुसार विविध निर्णय घेण्यात आले आहेत.

मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पुरस्कार वितरण ९ मे रोजी सोहळ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेत निवृत्त पत्रकारांना दरमहा ११ हजारऐवजी २० हजार रुपये निवृत्ती वेतन देण्याची घोषणा केली आहे, मात्र त्याचा शासन निर्णय अजून जारी करण्यात आला नसल्याची बाब विधान परिषद सभागृहात उपस्थित केली गेली. या संदर्भातील शासन निर्णय येत्या दोन दिवसांत जारी केला जाईल, अशी घोषणा मंत्री शंभूराज देसाई यांनी सभागृहात केली.



बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेत निवृत्तीचे वय ५८ आणि २५ वर्षे अनुभव असा निर्णय करण्यात यावा, अशी मागणीही सदस्यांनी केली. त्यानुसार तातडीने निर्णय घेऊन जाचक अटी कमी केल्या जातील, असे आश्वासन मंत्री देसाई यांनी सभागृहात दिले.

स्व. शंकरराव चव्हाण पत्रकार सुवर्णमहोत्सवी कल्याण निधी हा ट्रस्ट असून यामध्ये सध्या ५० कोटींची तरतूद आहे. (मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघासह पत्रकारांच्या इतर संघटनांच्या प्रयत्नामुळे हा निधी उपलब्ध झाला आहे.) या निधीमध्ये वाढ करण्यात येईल, असे मंत्री देसाई यांनी सांगितले. डिजिटल माध्यमांसाठी केंद्राचे जे निकष आहेत. ते तपासून त्या धर्तीवर डिजिटल माध्यमांसाठी धोरण आखले जाईल, असेही मंत्री देसाई यांनी सभागृहात स्पष्ट केले.

# औषधनिर्माणशास्त्र पदव्युत्तर प्रवेशाची अंतिम मुदत वाढवा

**मुंबई : प्रतिनिधी**

औषधनिर्माणशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकिया महाराष्ट्र राज्य सामाईक परीक्षा कक्षमार्फत सुरू करण्यात आली आहे. या प्रवेशाची अंतिम मुदत वाढविण्यात यावी याबाबत महाराष्ट्र राज्य सामाईक परीक्षा कक्ष आयुक्त महेंद्र वारभुवन यांची भेट घेत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेकडून निवेदन देण्यात आले.



महाराष्ट्रात अनेक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रकिया ही ऑनलाईन पद्धतीने महाराष्ट्र राज्य सामाईक परीक्षा कक्षामार्फत राबविली जाते. त्यानुसार औषधनिर्माणशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकियादेखील सुरू असून या अभ्यासक्रमासाठी अर्ज करण्यासाठी २६ जुलै ही अंतिम मुदत देण्यात आली आहे.

पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पदवीच्या अंतिम वर्षाचे गुण नमूद करणे आवश्यक असते, परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमाचे अंतिम वर्षाचे निकाल जाहीर झाले नसल्याने या विद्यापीठाचे अनेक विद्यार्थी अर्ज करू शकले नाहीत. त्यामुळे कुठल्याही विद्यार्थ्यांवर अन्याय न होता सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे यासाठी पदव्युत्तर प्रवेशाची अंतिम मुदत वाढविण्यात यावी, असे अभाविपने म्हटले आहे.

**अभाविपची निवेदनाद्वारे मागणी**

महाराष्ट्र राज्य सामाईक परीक्षा कक्षाची अंतिम मुदत २६ जुलै असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या अंतिम वर्षाचे निकाल अजून जाहीर झाले नसल्यामुळे अनेक विद्यार्थी अर्ज भरण्यापासून वंचित राहिले असून विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

त्यामुळे महाराष्ट्र राज्य सामाईक परीक्षा कक्षाने विद्यार्थी हिताचा विचार करीत औषधनिर्माणशास्त्र पदव्युत्तर प्रवेशाची मुदतवाढ करत विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा, असे मत अभाविप कोकण प्रदेशमंत्री अमित ढोमसे यांनी व्यक्त केले. अभाविपच्या निवेदनाला सकारात्मक प्रतिसाद देत महाराष्ट्र राज्य सामाईक परीक्षा कक्ष आयुक्त महेंद्र वारभुवन यांनी सर्व विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या निकालाबाबत आढावा घेऊन विद्यार्थी हिताचा निर्णय घेण्यात येईल, असे अभाविप शिष्टमंडळाला आश्वस्त केले.

# पनवेल मनपा मालमत्ता कर पुनर्निरीक्षण मोहिमेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत २४ जुलैपासून आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये कर पुनर्निरीक्षण मोहिमेला सुरुवात झाली आहे. या मोहिमेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे. २८ जुलैपर्यंत ही मोहीम सुरू राहणार असून दोन दिवसांमध्ये सुमारे १६२ नागरिकांनी या मोहिमेचा लाभ घेतला. महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.



या मोहिमेच्या पहिल्या दिवशी एकूण ५१ मालमत्तांधारकांनी, तर दुसऱ्या दिवशी १११ मालमत्ताधारकांनी आपल्या तक्रारी लेखी स्वरूपात नोंदविल्या. या वेळी आलेल्या अर्जाची पडताळणी करून उपायुक्त गणेश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर विभाग प्रमुख सुनील भोईर, लिपिक महेश गायकवाड आणि कर्मचारी यांनी तातडीने दुरूस्ती करून दिल्या.

या मोहिमेंतर्गत मालमत्तेचे बाह्यस्वरूपाच्या मोजमापामध्ये काही त्रुटी राहिली असल्यास, वापरामधील तफावत असल्यास, स्वमालकी असताना भाडेतत्त्वावर झालेली कर आकारणी झाली असल्यास मालमत्ताधारकांनी हरकती अर्ज सादर करावेत. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत क्षेत्रातील मालमत्तांना कलम १२९अ नुसार कर आकारणी करण्यात येत आहे. मालमत्ताधारकास यासंदर्भात काही हरकत असल्यासत्यांनी आपले हरकती अर्ज करावेत, तसेच पूर्णत्व प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र किंवा वापर दिनांकापासुन कर आकारणी, अनधिकृत शास्ती आकारणी बाबत, प्राथमिक कर आकारणीमध्ये नाव नोंद करणे, त्यामध्ये दुरुस्ती करणे याबाबात मालमत्ताधारकांच्या काही हरकती असल्यास त्यांनी आपला हरकत अर्ज पालिकेकडे करावा. ग्रामपंचायतकालीन भरणा केलेल्या पावत्यांचे समायोजन करणे, कर निर्धारणामध्ये किरकोळ दुरूस्ती, प्रथम कर आकारणीमध्ये दुरुस्ती असेल, कर आकारणी न झालेल्या मालमत्तांना कर आकारणीबाबतीत काही तक्रारी असल्यास त्यांनी आपला हरकत अर्ज या मोहिमेंतर्गत सादर करावा. मालमत्ताधारक आजी, माजी सैनिक असल्यास मालमत्ता कराच्या बिलात सवलत द्यायची राहून गेली असल्यास त्यांनी या मोहिमेचा लाभ घ्यावा.

मालमत्ताताधारकांनी आपला आक्षेप अर्ज व आपल्या कागदपत्रासहित २८ जुलैपर्यंत आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे सकाळी १०.३० ते १.३० या वेळेत सादर करावेत.

या ठिकाणी मालमत्ता कर पुनर्निरीक्षण मोहिमेंतर्गत बिलामधील विविध दुरूस्त्यासाठी खास पथकांचे नियोजन करण्यात आले आहे. संबधित पथकातील कर्मचारी मालमत्ताधारकांची हरकत लक्षात घेऊन तत्काळ बिलामध्ये दुरूस्ती करुन देत आहेत.

## मुंबई–कुडाळदरम्यान १८ अतिरिक्त अनारक्षित रेल्वेगाड्या

**रोहे : प्रतिनिधी**

गणपती उत्सव २०२३ दरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वे मुंबई ते कुडाळदरम्यान १८ अतिरिक्त अनारक्षित गणपती विशेष गाड्या चालवणार आहे.

मुंबई–कुडाळ गणपती स्पेशल ०११८५ विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सोमवार, बुधवार आणि शनिवारी १३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत रात्री १२.४५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी ११.३० वाजता कुडाळ येथे पोहोचेल. ०११८६ स्पेशल कुडाळहून येथून मंगळवार, गुरुवार आणि रविवारी १३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत १२.१० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी रात्री १२.३५ वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहचेल. या गाडीसाठी ठाणे, पनवेल, रोहा, मंगोवन, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजपूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली आणि सिंधुदुर्ग येथे थांबे देण्यात आले आहेत.

# ‘एसएनडीटी’मध्ये व्यवसायासह पदवीची संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) विद्यापीठात जुलै २०२३–२४ या शैक्षणिक वर्षापासून बी. कॉम आणि एम. कॉमसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना व्यवसायासह (अँप्रेन्टीसशिप) पदवी घेण्याची संधी विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण केंद्रातर्फे (सेंटर फॉर डिस्टन्स एज्युकेशन) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

अँप्रेन्टीसशिपसहित पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण देणारे एसएनडीटी महिला विद्यापीठ हे महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ आहे. विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. उज्ज्वला चक्रदेव यांच्या सतत लाभलेल्या मार्गदर्शनामुळे नव्या शैक्षणिक धोरणातील अँप्रेन्टीसशिपचा समावेश पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणात करण्यात आला आहे.

सध्या ही सुविधा बी. कॉम आणि एम. कॉम या अभ्यासक्रमांसाठी दिली जाणार आहे. बी. कॉम., एम. कॉमच्या पहिल्या वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींबरोबरच दूरस्थ शिक्षण केंद्रात वाणिज्य विद्याशाखेत दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींनाही अँप्रेन्टीसशिपची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. नव्या शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणाची सांगड उद्योग आणि व्यवसायाबरोबर घालण्यात अँप्रेन्टीसशिपची भूमिका फार महत्त्वाची राहणार आहे, अशी माहिती एसएनडीटी महिला विद्यापीठातील ‘सेंटर फॉर डिस्टन्स एज्युकेशन’च्या संचालक डॉ. स्मृती भोसले यांनी दिली.

प्रवेशासाठी विद्यार्थीनींनी दूरस्थ शिक्षण केंद्र, एसएनडीटी महिला विद्यापीठ, जुहू तारा रोड, सांताक्रूझ पश्चिम मुंबई–४०००४९ या पत्त्यावर संपर्क साधावा, असे डॉ. स्मृती भोसले यांनी सांगितले.

# पोलीस असल्याची बतावणी करून कॉटेजचालकांच्या लुटीचा प्रयत्न

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेल्या नागाव येथील कॉटेजचालकाला दोन दिवसांपूर्वी पोलीस असल्याचा कॉल आला होता. कॉटेजमध्ये अश्लील व्हिडीओ बनविल्याची तक्रार केल्याचे भासविले जाऊन ऑनलाईन आर्थिक लूट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे तुमचीही फसवणूक होऊ शकते. कॉटेज चालकांनी सावध रहा, असे आवाहन करण्यात येत आहे.

अलिबाग तालुक्यातील नागाव हे महत्त्वाचे पर्यटनस्थळ आहे. समुद्रकिनारी पर्यटकांची वर्दळ वाढल्याने स्थानिक व्यवसायिकांनादेखील चालना मिळू लागली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून नागावमधील कॉटेजचालकांना एक फसवणुकीचा कॉल येत असल्याची चर्चा आहे. ‘संभाजीनगर पोलीस ठाण्यातून एपीआय बोलतोय, तुमच्या कॉटेजमध्ये संभाजी नगरमधून एक कपल आले होते. त्या मुलाने मुलीचे अश्लील व्हिडीओ बनविला आहे. त्यामुळे मुलीने पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पीआय साहेबांनी तुमच्याशी बोलायला सांगितले आहे. तक्रारीत तुमच्या कॉटेजचे नाव येऊ शकते. तुमच्या नावाची तक्रार झाल्यावर सतत तुम्हाला नागपूर न्यायालयात फेऱ्या माराव्या लागतील. तुमचे तक्रारीत नाव नको असेल तर २० हजार रुपये गुगल पे करा’ अशा प्रकारची धमकी देऊन पैसे बळकावण्याचा प्रकार समोर येत आहे.

या कॉलमुळे कॉटेज व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातवरण निर्माण झाले आहे. व्यावसायिकांसह नागरिकांनी अशा बनवाट कॉलवर विश्वास न ठेवता कोणत्याही प्रकारचे ऑनलाईन आर्थिक व्यवहार करू नये असे आवाहन अलिबाग पोलीस निरीक्षक पवार यांनी केले आहे.

# काही वर्षांपूर्वी इर्शाळगडावरून पडले होते दगड

**खोपोली : प्रतिनिधी**

इर्शाळगडावरील दरडीने कित्येक वर्षे अंगाखांद्यावर खेळलेल्या कुटुंबांना निर्वासित केले असून ५७ जणांना कायमचे पोटात घेतले आहे. निसर्गाची आपत्ती अचानक नव्हती. काही वर्षांपूर्वी इर्शाळगडावर कड्यावरील मोठमोठे दगड कोसळून अडकून पडले होते. त्यामुळे गडाच्या कड्याकडे जाणारी वाट बंद झाली होती, परंतु गांभीर्याने या घटनेकडे न पाहिल्याने ढासळणारा इर्शाळगड रेकार्डब्रेक पावसात तग धरू शकला नाही.

३५०० फुटांवर घडलेल्या दुर्घटनेत निसर्गाचा रूद्र अवतारातदेखील काही साधनसामग्री नसताना देखील ज्या पद्धतीने मदतकार्य दोन तासांत सुरू झाले. त्याची नोंद घेण्यासारखी आहे. तालुक्यातील सह्याद्रीच्या पर्वतरांगेतील माणिकगडनंतर इर्शाळगड पर्यटकांना कायम खुणावत राहिला, परंतु या ठिकाणी राहणाऱ्या वाडीत नागरी सोयीसुविधांची कमतरता यामुळे पुनर्वसनासाठी हालचाली सुरू होत्या. त्या आधीच दु:खाचा डोंगर कोसळला. पाच वर्षांपूर्वी इर्शाळगडावर कड्यावरील मोठ मोठे दगड कोसळून अडकून पडले होते.



## वाडी स्थलांतरांच्या हालचाली आधीच सुरू

*काही महिन्यांपूर्वी आमदार महेश बालदी यांनी इर्शाळवाडीला भेट देत वाडीतील ग्रामस्थांशी संवाद साधला होता. वाडीचे स्थलांतर करण्यावर चर्चा झाली होती, अशी आठवण आमदार बालदी यांनी सांगितली.*

त्यामुळे गडाच्या कड्याकडे जाणारी वाट बंद झाली होती, परंतु गांभीर्याने या घटनेकडे न पाहिल्याने ढासळणारा इर्शाळगड रेकार्डब्रेक पावसात तग धरू शकला नाही.

दुर्दैवी घटनेचे खापर निसर्गावर फोडण्यापेक्षा निसर्गाने दिलेल्या संकटाची चाहूल अगोदर ओळखली असती, तर आज इर्शाळवाडी वाचली असती.

**गेल्या वर्षी काही ट्रेकर्स गडावर अडकले होते. त्या ठिकाणी पडलेले आणि पायाखालची दगड खडीचा निसरडा भाग यामुळे उतरणे कठीण बनले होते. अशा वेळी आमच्या पथकाने सुटका केली होती.**

**–योगेश शिंदे,**
**गिर्यारोहक, खोपोली**

# बोर्ली नाक्यावर रस्त्याची दुरवस्था

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ऐन पावसाळ्यात मुरूड तालुक्यातील बोर्ली नाक्यावरील रस्त्याची पुरती चाळण झाली असून सगळीकडे खड्डेच खड्डे दिसत आहेत. त्यामुळे येथील खड्डे त्वरीत भरण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

बोर्ली हे मुरूड तालुक्यातील मध्यवर्ती ठिकाण आहे. पर्यटनासाठी मुरूड, काशिदकडे जाताना बोर्लीहून पुढे जाता येते. नित्याने वाहतुकीसाठी गजबजलेल्या या रस्त्यावर प्रतिवर्षी पावसाळ्यात खड्डे पडतात. खड्डे पावसाच्या पाण्याने भरल्याने येथून जा–ये करीत असलेल्या वाहनाची भंबेरी उडतेच शिवाय येथून पायी चालत जात असलेल्या ग्रामस्थांनासुद्धा रस्ता शोधावा लागतो.

बोर्ली नाक्यावरील रस्त्याची काँक्रिटीकरण व्हावे, अशी मागणी येथील ग्रामस्थ करीत असूनही याकडे दुर्लक्ष होत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे.



पान १ वरून

## जल जीवन मिशन नळ पाणीपुरवठा योजनांचा लाभ सर्व घटकांना मिळावा

त्यापैकी चार कामांना वन विभागाची मंजुरी मिळाली आहे. वन विभागाच्या हद्दीत येणाऱ्या पाणीपुरवठा योजनांच्या उपांगांच्या कामाबाबत वन विभागाकडून आवश्यक ना हरकत दाखले मिळविण्यासाठी वन विभागास प्रस्ताव करण्यात आले आहेत. त्याचा पाठपुरावा करणे सुरू आहे.

वन विभागाची परवानगी प्रलंबित असलेल्या योजनांमध्ये, योजनांची वन विभागाच्या क्षेत्रातील उपांगाची कामे वगळता इतर कामे प्रगतीत आहेत. जी कामे पूर्णपणे वन विभागाच्या हद्दीत आहेत त्यांच्या परवानग्या तातडीने प्राप्त करून घेण्यात येत आहेत. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या एकूण १४५३ योजनांची कामे प्रगतिपथावर आहे. योजनांची कामे विहीत मुदतीत पूर्ण करण्याचे नियोजन असल्यामुळे निधी अखर्चित राहण्याचा प्रश्न नाही. योजनांची कामे पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा योजनांचा लाभ सर्व घटकांना मिळणार आहे. वन विभागाच्या परवानगीसाठी वन विभागाकडे सादर करण्यात आलेले प्रस्ताव सत्वर निकाली काढणे अनुषंगाने संबंधित यंत्रणांबरोबर वेळोवेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठका घेऊन राज्य तसेच केंद्र सचिव निर्देशित करण्यात येत आहे, असेही मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

# पनवेलमध्ये सापाला दिले जीवदान

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पोलीस चौकीत दडून बसलेल्या भल्यामोठ्या सापाला माजी नगरसेवक राजू सोनी यांचे स्विय सहाय्यक मंदार देसाई यांनी तत्परतेने सर्पमित्राला बोलावून सापाला शिताफीने पकडून दिल्याने जीवदान मिळाला आहे.

पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पोलीस चौकीत मंगळवारी (दि. २५) सकाळी अचानक खिडकीत साप येऊन बसला होता. त्या वेळी त्या ठिकाणी साफसफाई करण्यासाठी गेलेल्या माहिलेला तो दिसला. अचानक साप दिसल्याने ती महिला ओरडत घाबरून बाहेर आली. या वेळी ही बाब महिलेने बाहेर उभे असलेल्या पनवेल महापालिकेचे सफाई कामगारांचे मुकादम कुणाल साळवी व त्यांचे सहकारी यांना सांगितले. याबाबत परिसरात माहिती पसरताच नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले.

याचदरम्यान तेथून जात असताना माजी नगरसेवक राजू सोनी यांचे स्विय सहाय्यक मंदार देसाई याची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ सर्पमित्राला बोलावून घेतले. सर्पमित्राने अत्यंत शिताफीने व सुरक्षितपणे त्या सापाला पकडून जीवदान दिले. याबद्दल नागरिकांनी मंदार देसाई यांचे आभार मानले आहे.




## पाहिजेत

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली (महाराष्ट्र शासन)
मान्यताप्राप्त
शेतकरी कृषी संशोधन प्रशिक्षण संस्था, सोनिवली (स्टे. बदलापुर)
(रजि.क्र.एफ/४७४०/महा/५५३/९५/ठाणे)

डॉ. बा.सा. कोकण कृषी विद्यापीठ, दापोली मान्यताप्राप्त प्रा.चं. रं. म्हसे कृषी तंत्र विद्यालय, वारे येथे कृषी तंत्र पदविका (Agriculture Tech. Diploma) अभ्यासक्रमासाठी रिक्त पदांवर खालील कर्मचारी नियुक्त करणे आहे. तरी खाली नमुद केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणा–या उमेदवारांनी खाली दिलेल्या पत्यावर थेट मुलाखतीसाठी दि.०७ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वा. उपस्थित रहायचे आहे.
मुलाखतीस येतेवेळी आपल्या शैक्षणिक दाखल्यांच्या मुळप्रती सोबत आणणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | पदाची संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | पशुधन पर्यवेक्षक | दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशु संवर्धन पदविका प्रमाणपत्र | ०१ |
| ०२ | माळी | माळी प्रमाणपत्र | ०१ |
| ०३ | पहारेकरी | —— | ०१ |
| ०४ | स्वयंपाकी | —— | ०१ |

संपर्कासाठी पत्ता :– प्रा.चं.रं.म्हसे कृषी तंत्र विद्यालय, वारे. मु. वारे, पो. कळंब, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमणध्वनी :– ८८०५२०३३९८, ७८७५०४४९४७.

**सही/–**
अध्यक्ष
शेतकरी कृषी संशोधन प्रशिक्षण संस्था, सोनिवली (स्टे. बदलापुर)

## निवडक

### आवरे येथून मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** गव्हाणफाटा जवळील जेडब्ल्यूआर परिसरात पार्क केलेली मोटरसायकल अज्ञाताने चोरून नेली आहे. यांप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आवरे येथील हेमंत म्हात्रे यांनी त्यांची २० हजार रुपये किमतीची काळी-निळी हिरो होडा स्प्लेंडर मोटरसायकल (एमएच ४६ सीसी ७४९२) हि गव्हाणफाटा जवळील जेडब्ल्यूआर परिसरात पार्क केलेली होती, मात्र अज्ञात चोरट्याने ही मोटरसायकल चोरून नेली. यांप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेटे करीत आहेत.

### घरफोडीत ५६ हजारांचा माल चोरी

**पनवेल :** घरात कोणीही नसल्याचे पाहून अज्ञात व्यक्तीने घराचे दरवाजाचा कडी कोयंडा तोडून ५६ हजार सहाशे रुपयांची रोख रक्कम व मुद्देमाल चोरून नेल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. यांप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील जुना ठाणानाका रोड वरील पुष्कर इमारतीत राहणारे उल्हास सिनकर हे त्यांच्या पत्नीसह नातेवाईकांकडे गेले असता कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे दरवाजाचा कडी कोयंडा तोडून घरात असलेली चांदीची लक्ष्मीची मुर्ती, लक्ष्मी यंत्र, चांदीचे ब्रेसलेट, चांदीचे पान, तीन महागडी घडयाळे, स्मार्ट वॉच, ३ हार्ड डिस्क व ३५ हजार रूपये रोख रक्कम असा एकूण ५६ हजार सहाशे रूपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक किरण वाघ करीत आहेत.

### वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**मोहोपाडा :** रिस गावाच्या हद्दीत मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर अज्ञात वाहनाने अनोळखी पादचाऱ्यास ठोकर मारल्याने पादचारी गंभीर जखमी झाल्याने त्यास एमजीएम कामोठे हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते, परंतू त्याला गंभीर स्वरुपाचा दुखापती झाल्याने पादचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. अपघात करून वाहनचालक पसार झाला असून त्याचा तसेच अनोळखी मयत पुरुषाच्या नातेवाईकांचा तपास रसायनी पोलीस करीत आहेत. अनोळखी पादचारी पुरुष हा साधारण ५० वर्षे वयाचा असावा. त्याचा रंग सावळा, चेहरा उभट, केस साधारण सफेद, काळीदाढी वाढलेली आहे. याबाबत अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

### उरण येथे रानभाज्या महोत्सव

**उरण :** कृषी विभागाच्या वतीने मंगळवारी (दि. २५) तेरापंथ हॉल, फुल मार्केटजवळ म.भू. डॉ. नारायण विष्णू धर्माधिकारी शाळा १ व २ वैष्णवी हॉटेल जवळ श्री बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुलन, हॉल दत्त मंदिर जवळ आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके सभागृह, चाणजे आदी ठिकाणी रानभाज्या महोत्सवाच्या आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आळू, टेरा, शेवळा, करटोली, टाकला, कवळा, गाबाली, दिंडा अंबोशी सुरण आदींचा समावेश असल्याची माहिती कृषी विभागाकडून करण्यात आली आहे.

# रानसई धरण धोकादायक स्थितीत

## संरक्षण भिंतीचे प्लास्टर ढासळतेय; एमआयडीसीकडे पाहणी करण्याची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील औद्योगिक प्रकल्पांना, उरण शहर तसेच तालुक्यातील २५ गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या रानसई धरणाच्या संरक्षण भिंतीचे प्लास्टर ढासळू लागल्याने परिसरातील नागरिकांच्या पोटात भितीचा गोळा आला आहे. तरी एमआयडीसी (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) च्या अधिकाऱ्यांनी या धरणाची पाहणी करावी; अन्यथा चिपळूण येथील तिवरे धरणाची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भिती नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



महाराष्ट्र शासनाने एमआयडीसीच्या माध्यमातून उरण तालुक्यात रानसई या धरणाची उभारणी केली. यासाठी रानसई,विंधणे, आणि चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील शेतकऱ्यांच्या जमिनी १९७० साली संपादित करण्यात आल्या. रानसई या आदिवासी वाडी जवळील डोंगर परिसरात १९७० ते ८१ या कालावधीत २३६.७६ मीटर लांब व १४ मीटर खोली, तसेच १५ दरवाजे असणाऱ्या पाणलोट क्षेत्रातील धरणाची संरक्षक भिंत उभी केली आहे. ३५० एकर क्षेत्रात हे धरण आहे. यात १० एम. सी. एम. (१ हजार कोटी लीटर) इतके पाणी साठवले जाते. ओएनजीसी, एन ऐ डी,भारत पेट्रोलियम, महावितरण कंपनी, उरण शहर तसेच तालुक्यातील २५ गावातील जनतेला या धरणातील पाण्याचा पुरवठा करण्यात येतो.

रानसई हे धरण यावर्षी १८ जुलै २०२३ रोजी सततच्या पडणाऱ्या पावसामुळे ओव्हर फ्लो होऊन वाहू लागले आहे. मात्र धरणातून वाहणाऱ्या धारांमुळे धरणातील संरक्षण भिंतींला केलेले प्लास्टर हे ढासळू लागले आहे. त्यामुळे संरक्षण भिंतीच्या लोखंडी जाळ्या, सळई या उकडून प्लास्टर बरोबर खाली पडू लागल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. या अगोदर ही २ जुलै २०१९ मध्ये रानसई धरण ओव्हर फ्लो होऊन वाहू लागले असतानाही धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील संरक्षण भिंतींचे प्लास्टर अशा प्रकारे ढासळल्याची घटना घडली होती आणि तशा प्रकारची घटना पुन्हा एकदा यावर्षी १८ जुलै २०२३ रोजी झालेल्या रानसई धरण ओव्हर फ्लोच्या माध्यमातून समोर येत आहे.

एमआयडीसीच्या वरिष्ठ अधिकारी वर्गाने रानसई धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील संरक्षण भिंतींच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची पाहणी करून दोषी कंत्राटदारावर व संबंधित अधिकारी वर्गावर कठोर कारवाई करावी. अन्यता चिपळूण येथील तिवरे धरणाची जुलै २०१९ पुनरावृत्ती होण्यास वेळ लागणार नाही.अशी भिती धरणातील फेसळणाऱ्या पाण्याच्या धबधब्याची रोशणाई पाहण्यासाठी येणारे पर्यटकांसह येथील जाणकार नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहेत.

### लोखंडी सळ्या बाहेर

**एकंदरीत संबंधित ठेकेदारांनी रानसई धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील संरक्षण भिंतींच्या प्लास्टरचे काम हे निकृष्ट दर्जाचे केले असल्यामुळेच हे प्लास्टर ढासळू लागले असून धरणाच्या संरक्षण भिंतीच्या लोखंडी जाळ्या, सळ्या बाहेर आलेल्या आहेत, असे येथील कामगारवर्गाकडून सांगण्यात येत आहे.**



**पनवेल : पंचायत समितीचे माजी उपसभापती आणि उद्धव ठाकरे गटाचे युवा नेते देविदास पाटील यांनी उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली नुकताच भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला होता. पाटील यांनी मंगळवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी त्यांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. भाजपचे तालुका उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, सावळे ग्रामपंचायतीचे सरपंच सुनील माळी, पोयंजे विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर सुर्वे, झोपडपट्टी सेल अध्यक्ष महादेव कांबळे आदी सोबत होते.** (छाया : विकास म्हात्रे)




**पनवेल : भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची मंगळवारी भेट घेऊन आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कोळी यांचे अभिनंदन करीत पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे शहर सरचिटणीस अमरीश मोकल, सांस्कृतिक सेलचे जिल्हा अध्यक्ष अभिषेक पटवर्धन, अशोक आंबेकर उपस्थित होते.**

# बेलवली येथील शाळेत विद्यार्थ्यांना वह्यावाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बेलवली येथील शाळेत अधिराज सामाजिक विकास मंडळाच्यावतीने विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी मंडळाच्या अध्यक्षा प्रचिती पाटील यांनी या पुढील काळातही अश्याच प्रकाचे समाजकार्य सुरु ठेवणार असा मानस व्यक्त केले.



पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य आणि भाजप नेते निलेश पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांचे आयोजन करून नुकताच साजरा झाला. त्याअंतर्गत वाढदिवसाचे औचित्यसाधून अधिराज सामाजिक विकास मंडळाच्या वतीने पनवेल तालुक्यातील बेलवली येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या वाटपाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता.

या वेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करून त्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी बेलवली ग्रामपंचायतीच्या सरपंच संगीता भुतांबरा, उपसरपंच हेमंत तांडेल, सदस्य दिनेश पाटील, राम भवर, जितेंद्र बताले, जगदिश पाटील, अधिराज सामाजिक विकास मंडळाच्या अध्यक्षा प्रचिती निलेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते संतोष पाटील, सतिश पाटील, मुख्याध्यापिका जयश्री मोहीते यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये वित्तीय बाजार जागरूकता सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात मंगळवारी (दि. २५) स्टाफ वेल्फेअर कमिटी व स्किल डेव्हलपमेंट कमिटी तसेच टी डब्ल्यू जे असोसिएट्स खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने 'वित्तीय बाजार' या विषयावर सत्राचे आयोजन केले होते.



या सत्रासाठी टी डब्ल्यू जे असोसिएट्सचे पदाधिकारी हितेश, निकिता व प्रतीक या सर्वांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना तसेच प्राध्यापकांना वित्तीय बाजाराच्या संबंधित: निधी एकत्र करणे, भांडवल निर्मिती, पेमेंट सुविधा, शेअर्स, डिबेंचर्स, बॉण्ड्स, डेरिव्हेटिव्ह्ज, चलने व वित्तीय मालमत्ता विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयाची प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनीही महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच प्राध्यापकांना वित्तीय बाजाराविषयी मार्गदर्शन केले व सत्रासाठी शुभेच्छा दिल्या.

या सत्राचे आयोजन स्टाफ वेल्फेअर कमिटी समन्वयक प्रा. प्रतीक्षा पाटील व स्किल डेव्हलपमेंट कमिटी समन्वयक प्रा. रूपाली नागरेकर यांनी केले तसेच दोन्ही कमिटीच्या सर्व सदस्यांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# बीसीटी लॉ महाविद्यालयात राष्ट्रीय प्रसारण दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय प्रसारण दिनानिमित्त खांदा कॉलनीमधील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) कॉलेज ऑफ लॉ येथे प्रभारी प्राचार्या धनश्री योगेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली रेडिओ आणि शांती या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले होते. महाविद्यालयाच्या आयक्यूएसी समितीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे नेतृत्व सहायक प्राध्यापक हिमांशू मोरे यांनी केले.



## 'रेडिओ आणि शांती'वर विशेष व्याख्यान

या कार्यक्रमात सहाय्यक प्राध्यापक रवनिश बेक्टर, डॉ. ममता गोस्वामी, अपराजिता गुप्ता, भाग्यश्री कांबळे, राघव शर्मा, सागर देवघरे, डॉ. क्रांती भोवटे, अनम मेहंदीकर आणि बिंदिया खान यांच्यासह शैक्षणिक क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचा मेळावा दिसला. महाविद्यालयात बीएलएस एलएलबी आणि एलएलबी अभ्यासक्रम शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान खुले होते. एलएलबी अंतिम वर्षाचा विद्यार्थी संदीप सिंग याने भारतीय ब्रॉडकास्टिंग कंपनीने भारतात प्रथमच रेडिओ प्रसारित केल्याच्या स्मरणार्थ राष्ट्रीय प्रसारण दिनाच्या ऐतिहासिक महत्त्वावर भर दिला. आदरणीय वक्ते विश्वरथ नायर यांनी समाजात शांतता आणि सौहार्द वाढवण्यासाठी रेडिओच्या महत्त्वाच्या भूमिकेवर प्रकाश टाकला.

शांतता आणि समजूतदारपणाची संस्कृती वाढवताना माहिती, शिक्षण आणि मनोरंजनाचा प्रसार करण्यासाठी रेडिओचा प्रभावी माध्यम म्हणून त्यांनी प्रकाश टाकला. सामाजिक बदल, संघर्षाचे निराकरण आणि विविध समुदायांमधील अंतर कमी करण्यासाठी रेडिओच्या संभाव्यतेबद्दल चर्चा करण्यात सहभागी झाले. कार्यक्रमाचे आयोजक म्हणून सहाय्यक प्राध्यापक हिमांशू मोरे यांनी व्याख्यान यशस्वी करण्यासाठी आयक्यूएसी समिती आणि सर्व उपस्थितांचे सहभागाबद्दल आभार मानले.

रेडिओ आणि शांती या विषयावरील विशेष व्याख्यानाने विद्यार्थी आणि प्राध्यापक सदस्यांना शांततेचा प्रचार करण्यासाठी रेडिओ प्रसारणाचे महत्त्व आणि निःपक्षपाती माहितीच्या प्रसारावर त्याचा प्रभाव याबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी मिळविण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. प्रेरणा गायकवाड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. एलएलबी अंतिम वर्षाचा विद्यार्थी साहिल मोरे याने आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# कामोठ्यामध्ये पाण्याचे योग्य व्यवस्थापन करा

## डॉ. अरुणकुमार भगत यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील कामोठे येथील पाण्याचे योग्य व्यवस्थापन करण्यात यावे, अशी मागणी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी पालिका आयुक्तांकडे निवेदन दिले आहे.

डॉ. भगत यांनी निवेदनात म्हटले आहे की, पनवेल महापालिका हद्दीतील कामोठे येथील पाणी व्यवस्थापन हे सध्या सिडको विभागाच्या अधिनस्त येत आहे. सध्या या भागातील सर्वच नागरिक मालमत्ता कर पनवेल महापालिकेस अदा करत आहेत. त्यामुळे पनवेल महापालिकेने या नागरिकांना मुलभूत सोयींचा पुरवठा करण्याच्या अनुषंगाने पुरेसा पाणीपुरवठा करणे अत्यंत अत्यंत आवश्यक आहे. सबब मागील अनेक दिवसांपासून कामोठे भागातील पाण्याचे नियोजन व्यवस्थीत नसल्याने नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नसल्याने त्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे.

याबाबत आपल्याकडे तक्रार केली असता हे नियोजन पूर्णपणे सिडको विभाग करीत असल्याचे सांगण्यात येत आहे, परंतु यावर प्रभावी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने महापालिकेने एका जबाबदार अधिकाऱ्याची नेमणूक याकरीता करावी जेणेकरून सिडको विभाग व पनवेल महापालिका यांना समन्वयाने काम करता येईल. या समस्येचे निराकरण लवकरात लवकर होईल. पनवेल महापालिका हद्दीतील कामोठे येथील पाणीपुरवठा नियोजनाकरिता महापालिकेच्या अधिकाऱ्याची नेमणूक करून कामोठे येथील पाणी प्रश्नाची समस्या तातडीने सोडवण्यात यावी, असेही डॉ. भगत यांनी निवेदनात नमुद केले आहे.





**पनवेल : येथील प्रसिद्ध पटेल ज्वेलर्समध्ये आयोजित पैंजण महोत्सवाचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले. हा महोत्सव ३१ जुलैदरम्यान सुरू राहणार असून पैंजणाच्या घडणावळीवर ५० टक्के सूट, तर दररोज एका भाग्यवान विजेत्यास एक चांदीचे पैजण जिंकण्याची संधी मिळणार आहे. या महोत्सवाच्या उद्घाटनावेळी माजी नगरसेविका नीता माळी, भाजपचे शहर खजिनदार संजय जैन, प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी यांच्यासह पटेल ज्वेलर्सचे मालक, कर्मचारी उपस्थित होते.** (छाया : प्रफुल्ल कांबळे)

## संपादकीय

# पूरस्थितीचे संकट


देशभरात अनेक भागांमध्ये तूर्तास पूरस्थितीचा सामना करावा लागतो आहे. यापूर्वी कधीही पूरस्थिती न ओढवणाऱ्या भागांनाही आता पुराचा फटका बसताना दिसतो आहे. दुर्दैवाने या परिस्थितीवर कुठलाही एक उपाय सर्वांच्या उपयोगाचा नाही. प्रत्येक ठिकाणच्या पुरामागचे कारण वेगळे असल्याने ते लक्षात घेऊनच प्रतिबंधात्मक उपाययोजनेचे नियोजन करावे लागणार आहे.

**महिनाभरापूर्वी बिपरजॉय चक्रीवादळामुळे गुजरात आणि राजस्थानमध्ये प्रचंड नुकसान झाले. त्यात आता बंगालच्या उपसागरात पुन्हा नवीन चक्रीवादळ घोंघावत असल्याची माहिती हवामान खात्याकडून देण्यात आली आहे. या चक्रीवादळाच्या शक्यतेमुळे देशातील १२ राज्यांमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून यात महाराष्ट्रातील कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या विभागांमध्ये येत्या तीन दिवसांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्राखेरीज गुजरात, हिमाचल प्रदेश, राजस्थानचा पूर्व भाग, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आंध्र प्रदेश, ओडिशा, तामिळनाडू, कर्नाटक, अरुणाचल प्रदेश आणि अंदमान-निकोबार बेटांवर अतिवृष्टीची शक्यता आहे. उत्तरेकडील काही राज्यांमध्ये आधीच पूरसदृश स्थिती आहे. गंगा आणि यमुना या मोठ्या नद्यांखेरीज रावी, बिआस, सतलज या नद्यांच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. दिल्लीनजीकच्या नोएडामधील हिंडन नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाल्याने नदीपात्रानजीकच्या भागात मंगळवारी जवळपास ३०० मोटारी पाण्यात बुडाल्या. अनेक घरांमध्येही पाणी घुसल्याने लोकांना नजीकच्या शाळांमध्ये हलवण्यात आले. दिल्लीला या आधीच पुराचा फटका बसला असून यमुनेचे पाणी १९७८च्या पुरानंतर यंदा प्रथमच थेट ताज महालच्या भिंतीपर्यंत पोहचल्याची नोंद झाली आहे. अगदी राजस्थानातील कोटा येथेही अतिवृष्टीमुळे नागरी वस्त्यांमध्ये मगरी फिरू लागल्याचे दिसून आले. भारताला पुरांचा फटका नेहमीच बसत आला आहे तरी गेल्या काही वर्षांत पुरांमुळे होणारे आर्थिक नुकसान कमालीचे वाढल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. वाढती लोकसंख्या, झपाट्याने होत चाललेले शहरीकरण, बेसुमार जंगलतोड, सांडपाण्याचा निचरा करणारी निकृष्ट यंत्रणा, नद्यांवरील वाढती धरणे आणि एकंदरच वाढलेली विकासकामे ही कारणे या वाढत्या पुरांमागे आहेत असे तज्ज्ञ सांगतात. वाढते जागतिक तापमान, त्यातून होत चाललेला हवामान बदल यामुळे टोकाचे हवामान हे आता नित्याचे होत चालले आहे. वाढते पूर हा त्याचाही भाग आहेच. कुठे सखल भागांमध्ये अतिमुसळधार पावसामुळे पूरसदृश स्थिती निर्माण होते तर कुठे नद्यांच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाल्यामुळे पुराचा सामना करावा लागतो. चक्रीवादळांमुळे समुद्राचे पाणी किनारपट्टीच्या भागात आत शिरण्याचा फटका शहरी भागांनाही बसतो आहे. शहरी भागांमध्ये लोकसंख्या दाट असल्याने नुकसानही मोठे असते. क्वचित काही ठिकाणी पुरांमुळे शेतजमिनीचा दर्जा सुधारतो तर बहुतांश ठिकाणी रेती वा गाळ शेतात येऊन साठल्याने जमिनींचे मोठे नुकसान होते. अनेक ठिकाणी पुरांमध्ये जमिनींची प्रचंड धूपही होते. पुरांमुळे भूजलसाठ्यांचेही मोठे नुकसान होते. अनेक ठिकाणी पाण्याचा निचरा न होण्यामागे प्लास्टिकचा कचरा असल्याचेही दिसते. प्लास्टिकबंदी आजही म्हणावी तितकी प्रभावी ठरलेली नाही. त्यामुळे अनेक शहरी भागांमधील सांडपाण्याचा निचरा करणाऱ्या यंत्रणा कुचकामी ठरत आहेत. पुरांमागची कारणे अनेक स्वरुपाची असली तरी ज्या कारणांना रोखणे आपल्या हातात आहे, किमान त्यांचा तरी गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. अन्यथा प्रत्येक पावसाळा हा जीवित हानीबरोबरच मोठे आर्थिक नुकसान करणारा ठरणार आहे.**

# ऑनलाईन गेम्सचा तरुणाईला विळखा!

ऑनलाईन गेम्सच्या विळख्यात सध्याची तरुणाई सापडली आहे. या तरुणाईचे प्रबोधन करण्यासाठी अनोखे आंदोलन करणाऱ्या एका गृहस्थाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. या व्हिडिओत आपल्या स्कुटरवर मेगाफोन लावून हे गृहस्थ ऑनलाईन गेम्सची जाहिरात करणाऱ्या एका सिनेकलावंताला या जाहिराती न करण्याची विनंती करताना दिसत आहेत. त्यासाठी त्यांनी भीक मांगो आंदोलन छेडले असून कलाकारांना पैसे कमी पडत असतील, तर मी अधिक भीक मागून त्याद्वारे पैसे जमा करून त्यांना पाठवेन असे ते सांगत आहेत. त्यांचे हे अनोखे आंदोलन लोकांना मनोमन पटल्याने अनेक जण तो व्हिडीओ आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरून शेअर करत आहेत. ऑनलाईन गेम्सचे वाढते प्रस्थ लक्षात घेता भविष्यात तरुणाईवर फार मोठे संकट येऊ शकते त्यासाठी त्यावर आजच उपाय शोधायला हवा. याच विषयाची उहापोह करणारा हा लेख.

एक काळ असा होता जेव्हा केवळ लहान मुलेच खेळताना दिसत असत आणि आताचा काळ असा आहे की लहानांपेक्षा मोठेच अधिक संख्येने खेळताना दिसतात. भेद केवळ एव्हढाच कि लहान मुले तेव्हा मैदानात खेळत असत आणि आताची प्रौढ पिढी मोबाईलवर खेळताना दिसत आहे. 'ऑनलाईन गेम्स'चे आजमितीला एव्हढे प्रस्थ वाढले आहे की, एखाद्याच्या मोबाईलमध्ये 'गेमिंग ॲप' नसणे म्हणजे आश्चर्यच म्हणावे लागेल. बस, ट्रेन, कार्यालये आणि घरीही आजची तरुणाई अनेकदा ऑनलाईन गेम्समध्येच गुंतलेली दिसते. सध्या आघाडीवर असलेले बहुसंख्य सिने कलावंत आणि खेळाडू 'ऑनलाईन गेम्स'च्या जाहिराती करताना आणि त्या माध्यमातून लोकांना भरघोस रकमेची बक्षिसे जिंकण्याची हमी देताना दिसत आहेत. सर्वच ठिकाणी या जाहिरातींचे पेव फुटलेले आहे. सिगारेटच्या पाकिटावर जसा वैधानिक इशारा छापलेला असतो तसा या जाहिरातींमध्येसुद्धा असतो; मात्र त्याकडे लोकांचे फारसे लक्ष जाणार नाही याचीही काळजी जाहिरातदाराने घेतलेली असते.



आजमितीला मोठा तरुणवर्ग या 'ऑनलाईन गेम्स'च्या आहारी गेलेला आहे. या गेम्समध्ये आरंभी पैसे मिळतात. त्यामुळे 'गेम्स'वरील विश्वास वाढीस लागतो. अधिक पैसे गुंतवल्यास अधिक पैसे मिळतील या अपेक्षेने खेळणारे त्यामध्ये अधिकाधिक पैसे गुंतवू लागतात. आज हरलो तरी उद्या नक्कीच जिंकू या आशेने कर्ज काढतात, घरातील दाग-दागिने विकतात जमीन-जुमला गहाण ठेवतात; मात्र अनेकांच्या जीवनात जिंकवून देणारा तो उद्या कधी उजाडतच नाही, जेव्हा जाग येते तेव्हा सर्वस्व गमावलेले असते. एक-दोन नव्हे, तर अशा शेकडो घटना आजवर घडल्या आहेत ज्या अद्याप उजेडात आलेल्या नाहीत. सर्वस्व गमावणाऱ्या काही जणांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला तर काही मनोरुग्ण झाले. अर्थात प्रतिदिन खेळणाऱ्यांना हे माहित नाही असेही नव्हे, दारू प्यायल्याने काय शेवट होतो, सिगारेट पिण्याचे आणि गुटखा तंबाखू खाण्याचे काय परिणाम होतात हे माहीत असूनही त्यांचे व्यसन करणाऱ्यांचे प्रमाण जसे घटलेले नाही तसे आजच्या पिढीला ऑनलाईन गेम्सचे एव्हढे वेड लागले आहे कि त्यामुळे काय परिणाम होतात हे माहीत असूनही ते सुटण्याचे नाव घेत नाही.

'ऑनलाईन गेम्स'ची निर्मिती करणारे आणि त्याच्या जाहिरातींसाठी अब्जावधी रुपये खर्च करणारे कोणीही दानशूर व्यक्ती नाहीत जे लोकांना धन वाटायला बसले आहेत. ऑनलाईन गेमच्या माध्यमातून प्रतिदिन कोट्यवधी रुपयांची कमाई ते करत असतात. हा पैसा अधिक धनाच्या लालसेने आपणच त्यांना बहाल केलेला असतो. अधिक धनाची लालसा हेच या 'गेम्स'चे पेव फुटण्यामागील महत्वाचे कारण असून तेच अनेकांच्या नाशालाही कारणीभूत ठरत आहे. जुगार खेळणारी व्यक्ती केवळ आपल्या स्वार्थाचा विचार करते. अन्य कुणाची तरी हानी होईल तेव्हा आपल्याला लाभ होणार आहे हे ज्ञात असूनही जुगार खेळणाऱ्या व्यक्तीला इतरांची पर्वा नसते.

ज्या 'ऑनलाईन गेम्स'मुळे युवापिढीचे प्रतिदिन कोट्यवधी तास केवळ खेळण्यात वाया जात आहेत, ज्या 'गेम्स'मुळे अनेकांचे संसार रस्त्यावर आले आहेत. ऑनलाईन गेम्सचे वाढते प्रमाण लक्षात घेता यांवर बंदी आणण्यासाठी भविष्यात व्यापक जनआंदोलन उभारण्याची आवश्यकता भासू शकते.

**-जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

# कारगिल विजय दिन




कारगिलच्या लढाईत भारताने मिळवलेला विजय 'कारगिल विजय दिवस' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी कारगिलच्या लढाईत शहीद झालेल्या वीरांच्या आठवणी जागवल्या जातात. कारगिल विजय दिवस हा भारतीय सैन्यांच्या शौर्याची आठवण सदैव जागृत ठेवणारा दिवस असून देशाबद्दल त्यागाची आणि सैनिकांप्रती कृतज्ञतेची भावना जागृत करणारा दिवस आहे. २६ जुलै हा कारगिल दिन म्हणून साजरा होतो...त्याविषयी.

इतिहासात हा विजय सोनेरी अक्षरात लिहिण्यासारखाच आहे. कारगिल युद्धात शहीद झालेल्या भारतीय सैन्याच्या शूर अधिकाऱ्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'कारगिल विजय दिवस' देशभरात साजरा करण्यात येतो. याच दिवशी भारतीय सैन्याच्या जवानांनी कारगिलमध्ये विपरित परिस्थितीत शत्रूसैन्याला नामोहरम केले. कारगिलच्या शहिदांचे नागरिक सन्मानाने स्मरण करण्याबरोबरच, देशातील सैनिकांचा आदर करण्याचा हा दिवस असतो. देशासाठी शहीद झालेल्या वीरांच्या शौर्याची व बलिदानाची आठवण करून आपली देशभक्ती जागृत करण्यासाठी कारगिल विजय दिवसाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन देशभरात करण्यात येत असते. भारतीय सैन्याचे देशप्रेम, स्वयंशिस्त, श्रद्धा, शारीरिक व मानसिक सामर्थ्य, तसेच वीरवृत्ती उल्लेखनीय असते आणि त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आपण देशहितासाठी कार्य करणे आवश्यक आहे. सैनिकांनी केलेल्या त्यागाबद्दल आपण सर्वांनी कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातही उद्या १८ वा कारगिल विजय दिवस साजरा करण्यात येणार असून यानिमित्ताने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यावेळी राज्यातील ३४ लाभार्थींना धनादेश आणि ताम्रपट देऊन त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबियांचा गौरव करण्यात येणार आहे. सैनिकांच्या कुटुंबियांच्या पाठिशी शासन खंबीरपणे उभे असून त्यांच्या विकासासाठी शासन स्तरावर विविध योजना राबविण्यासह त्यांना सर्वतोपरी मदत करण्यात येत असते. सैनिकांच्या कुटुंबासाठी शैक्षणिक व वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

कारगिल विजय दिवस हा देशासाठी अभिमानाचा दिवस असून या युद्धात शहीद झालेल्या तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जवानांप्रती समाज आणि शासन कृतज्ञ राहील. कारगिल युद्धात बलिदान देणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करतानाच त्यांच्या शौर्याचे स्मरण करण्यासाठी २६ जुलै हा कारगिल विजय दिवस म्हणून साजरा करण्याचा उपक्रम महत्त्वपूर्ण आहे. देशासह देशवासियांचे संरक्षण करण्यासाठी सीमेवर सैनिक अहोरात्र पहारा देत असतात. त्यावेळी आपले सैनिक स्वतःसह कुटुंबाचाही विचार करीत नाही, फक्त देशाचाच विचार करतात. देशासाठी प्राणार्पण केल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांना आधार देण्यासह त्यांची जबाबदारी उचलणे हे आपले सामाजिक कर्तव्यच आहे.

**(साभार : विकासपीडिया)**



## बदलते तंत्रज्ञान

# ट्विटरने बदलला लोगो, निळा पक्षी उडाला भुर्ररर




ट्विटर आता द म्हणून ओळखले जाईल. यासोबतच ट्विटरच्या अधिकृत हँडलवर (Twitter) लोगो बदलण्यात आला आहे. यासोबतच नाव बदलून द असे करण्यात आले आहे. मात्र, मायक्रोब्लॉगिंग वेबसाइटवर फक्त जुना लोगो दिसत आहे. ट्विटरच्या सीईओ लिंडा याकारिनो यांनीही ट्विट करून एक्स नावाची माहिती दिली. जुन्या लोगोमध्ये निळ्या रंगाचा पक्षी वापरण्यात आला होता, मात्र आता काळ्या रंगाचे द चे चिन्ह वापरले आहे.

जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपैकी एक असलेल्या इलॉन मस्कने ट्विटर विकत घेतल्यापासून या प्लॅटफॉर्मवर अनेक बदल करण्यात आले आहेत. पण नाव आणि लोगो बदलणे हा आजवरचा सर्वात मोठा निर्णय आहे. लिंडा याकारिनो यांनी ट्विट केले की, कॅमेरा प्रमाणे एक्स, यासोबतच तिने इमारतीवरील एक्स लोगोच्या प्रकाशाचाही उल्लेख केला. मस्कचे एक्स या अक्षरावर जुने प्रेम आहे. या वर्षी एप्रिलमध्ये, एलॉन मस्क यांनी लिंडा याकारिनो यांची नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती केली. त्यांचे स्वागत करताना, मस्क यांनी ट्विट केले होते की ते या प्लॅटफॉर्मचे द, एव्हरीथिंग ॲपमध्ये रूपांतर करण्यासाठी लिंडासोबत काम करण्यास उत्सुक आहेत. त्यावेळीच याबद्दलचे संकेत मिळाले होते.

**ट्विटर मुख्यालयावर नवीन लोगो**

ट्विटरमध्ये आणखी अनेक सेवा देण्याची योजना सध्या मस्क यांच्या डोक्यात आहे. ट्विटरमध्ये अनेक नवीन बदल होणार आहेत, ज्याबद्दल आधीच सूचित करण्यात आले आहे. मस्कने द प्लॅटफॉर्मबाबत मोठी तयारी केली आहे आणि आणखी अनेक सेवाही आणत आहेत. या वर्षी एप्रिलमध्येच ट्विटरने आपल्या पार्टनरसोबत अधिकृत डीलसाठी एक्स कॉर्पचे नाव वापरले होते. मस्क यांनी एका दिवसापूर्वीच नवीन नावाचा टीझर रिलीज केला होता. त्याने फोटो ज्या नावाने पोस्ट केला होता तेही त्याने सूचित केले होते. एलॉन मस्कची Space द नावाची कंपनीदेखील आहे.

# कवी, समाजसेवक वासुदेव गोविंद मायदेव



## निमित्त

कविवर्य वासुदेव गोविंद ऊर्फ वा. गो. मायदेव हे रविकिरण मंडळातील कवींचे म्हणजे, माधवराव पटवर्धन ऊर्फ माधव ज्यूलियन, यशवंत, गिरीश, श्री. बा. रानडे आदींचे समकालीन कवी. गंभीर विचारवृत्तीच्या; तसेच बालांसाठीच्या विपुल कविता मायदेव यांनी लिहिल्या. त्या काळी लहान मुलांमध्ये मायदेव यांच्या बालकविता विशेष आवडीच्या असत. आज त्यांचा जन्मदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी...

कवी वनमाळी या टोपणनावानेही ते साहित्यक्षेत्रात परिचित होते. 'काव्यमकरंद', 'भावतरंग', 'भावनिर्झर', 'सुधा', 'भावविहार' हे त्यांचे काव्यसंग्रह; तर 'बालविहार', 'किलबिल', 'शिशुगीत', 'क्रीडागीत' हे बालगीतसंग्रह प्रसिद्ध आहेत.

आयुष्याची अखेर वगळता मायदेव यांचे बहुतांश आयुष्य पुण्यात गेले. फर्गसन महाविद्यालयात शिक्षण झाल्यानंतर महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या हिंगण्यातील स्त्री-शिक्षण संस्थेत ते नोकरीसाठी रुजू झाले. या संस्थेचे ते आजीव सभासद होते. येथेच त्यांनी दीर्घ काळ शिकविले. मायदेव यांनी त्या काळी प्रेमविवाह केला होता, मात्र त्यांचा संसार शेवटी शेवटी मनस्तापदायक झाल्याचे म्हटले जाते.

मायदेव यांच्यावर एक सावत्र भाऊ व चार सावत्र बहिणी अशी पाच भावंडांची जबाबदारी होती. या भावंडांचा शैक्षणिक खर्च, त्यांच्या विवाहांचा खर्च मायदेव यांना करावा लागला होता. प्रापंचिक खर्चात कपात करून या खर्चाला त्यांनी प्राधान्य दिले होते. या कारणामुळे त्यांच्या संसारात कुरबुरी होत असल्याचेही म्हटले जाते.

मायदेव म्हटले की, कवितांची आवड असणाऱ्या जुन्या पिढीतील वाचकांना हटकून आठवणार ती त्यांची 'गाइ घरा आल्या' ही सुंदर कविता. सकाळी चरायला गेलेल्या गाई संध्याकाळी घरी आल्या तरी गाई राखायला गेलेला 'वनमाळी' मात्र काही घरी आलेला नसतो. कातरवेळ उलटते, रात्रही होते, तरी वनमाळी न आल्यामुळे आईच्या जिवाची जी उलघाल होते, तिचे वर्णन मायदेव यांनी या कवितेत अतिशय साध्या-सोप्या शब्दांत केले आहे. ही कविता हीच मायदेव यांची ओळख होती. १९२९ साली त्यांनी ती लिहिली. १९१५ ते १९२९ या कालखंडात त्यांच्या हातून ज्या कविता लिहून झाल्या, त्या सर्व कविता 'भावतरंग' या संग्रहात वाचायला मिळतात. 'गाइ घरा आल्या' ही कविता याच संग्रहात आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर आणि भा. रा. तांबे यांच्या कवितांचेही संपादन मायदेव यांनी केले होते. ना. दा. ठाकरसी विद्यापीठासाठी लाखो रुपयांच्या देणग्या मायदेव यांनी मिळवून दिल्या होत्या. भौतिक लाभाची कोणतीच अपेक्षा न बाळगणारी जी एक पिढी स्वातंत्र्यपूर्व काळात होती, त्या पिढीच्या प्रतिनिधींपैकीच मायदेव हे एक होते.

मायदेव यांचे बहुतांश आयुष्य पुण्यात गेले. सुरवातीला हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेच्या आवारातील दोन खोल्यांत त्यांचे वास्तव्य होते. नंतरचा त्यांचा काळ डेक्कन जिमखान्यावरील त्यांच्या बंगल्यात गेला. आयुष्याच्या अखेरच्या पर्वात त्यांना पुण्याहून मुंबईला स्थलांतर करावे लागले. गिरगावातील चाळीत एका छोट्याशा खोलीत ते राहत, खानावळीत जेवत व महिन्याचा खर्च ४०-५० रुपयांत भागवत असत! अशा विपन्नावस्थेतच ३० मार्च १९६९ रोजी त्यांची अखेर झाली.

**(साभार : मनोगत)**

## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : तालुक्यातील गोपाळवट येथील डोंगरावर केल्या जाणाऱ्या शेतीचे ड्रोनच्या सहाय्याने घेतलेले छायाचित्र.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# केसांसाठी 'या'फूड्सचा करा डाएटमध्ये समावेश



आजच्या काळात खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी आणि वाढत्या प्रदूषणामुळे केस खराब होणे ही एक सामान्य समस्या आहे. विशेषतः केस गळणे आणि पातळ होणे ही हळूहळू मोठी समस्या बनत चालली आहे. अशा वेळी तुम्हाला हेल्दी डाएट घेण्याची गरज आहे कारण तुम्ही जे काही खाता त्याचा थेट परिणाम तुमच्या आरोग्यावर, त्वचेवर आणि केसांवर होतो. आज आम्ही तुम्हाला असे काही पदार्थ सांगणार आहोत जे केसांची गुणवत्ता आणि वाढीला चालना देतात त्यांचा आहारात समावेश करून त्यांना प्रोत्साहन देतात, तर चला जाणून घेऊया असे कोणते पदार्थ केसांच्या वाढीसाठी उपयुक्त आहेत

**केसांच्या वाढीसाठी उपयुक्त पदार्थ**

**जांभूळ :** व्हिटॅमिन सी सारख्या शक्तिशाली अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असणारं जांभूळ! केसांच्या मुळांचे नुकसान आणि फ्री रॅडिकल्सपासून संरक्षण करण्यास मदत करतात. त्याच वेळी, आपले केस जर तुटत असतील तर त्यावर हे एक सुपरफूड आहे असं म्हणायला हरकत नाही.

**ड्रायफ्रुट्स :** बदाम, काजू आणि अक्रोड सारख्या ड्रायफ्रूटमध्ये बायोटिन किंवा व्हिटॅमिन बी ७ सारखे गुणधर्म असतात जे आपल्या केसांची गुणवत्ता सुधारतात, आपले केस लांब आणि दाट बनवतात. त्याचबरोबर शेंगदाणे खाल्ल्याने हृदयाशी संबंधित आजार आणि शरीरात जळजळ होण्याचा धोका कमी होतो.

**फ्लॅक्ससीड्स :** यात कॅलरी कमी असतात, म्हणून ते आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर मानले जातात. आपण स्मूदी किंवा स्नॅक म्हणून या बियाण्याचे सेवन करू शकता. त्यांचे सेवन केल्याने आपल्या केसांचे आरोग्य चांगले राहते.

**पालक :** पालक व्हिटॅमिन ए, सी, लोह, प्रथिने आणि फोलेट सारख्या गुणधर्मांनी समृद्ध आहे, जे केसांच्या वाढीस चालना देते. अनेकदा शरीरात रक्ताची कमतरता हे देखील केस गळण्याचे एक प्रमुख कारण असते, त्यामुळे पालकाचे सेवन केल्यास तुम्हाला निरोगी केस मिळू शकतात.

**(दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

# महाडमधील पारमाची गाव पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत

## घरांना तडे; पुन्हा दरड कोसळण्याची टांगती तलवार

**महाड : रामप्रहर वृत्त**

सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये वसलेल्या महाड तालुक्यातील पारमाची गावावर २९ वर्षांपूर्वी दरड कोसळून १३ जणांचा मृत्यू झाला होता, तर अनेक घरे मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडली गेली होती. त्याच घटनेची पुनरावृत्ती पुन्हा होते की काय अशी भीती निर्माण झाली आहे. या गावातील घरांना पुन्हा तडे पडल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. शासनाने गावाचे त्वरित पुनर्वसन करावे अशी मागणी पारमाचीच्या ग्रामस्थांनी केली आहे.



तालुक्यातील सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये व वरंधा घाटाच्या कुशीत वसलेल्या पारमाची या गावावर २८ जून १९९४ रोजी दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत १३ जणांचा मातीच्या ढिगाऱ्याखाली सापडून मृत्यू झाला होता, तर अनेक घरे जमीनदोस्त झाली, पाळीव जनावरे दरडीखाली गाडली गेली. त्याच गावात पुन्हा एकदा घरांना तडे गेले असून अनेक घरे कोसळण्याच्या स्थितीत असल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.

वरंध घाटाच्या पायथ्याशी असणाऱ्या पारमाची गावाची लोकसंख्या २५५ आहे. हे गाव सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये बसलेले असून संपूर्ण गाव डोंगर उतारावर असल्याने या गावातील नागरिक पावसाळ्यात १९९४च्या पुनरावृत्तीनंतर कायम भीतीच्या छायेखाली वावरत आहेत. गावातील घरांना तडे गेल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.

याबाबत महाडचे तहसीलदार महेश शितोळे व प्रांताधिकारी ज्ञानोबा बानापुरे यांनी तातडीने याबाबत दखल घेऊन तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांतर्फे पंचनामे करून वस्तूस्थिती जाणून घेण्यास सुरुवात केली आहे. गावातील सद्यस्थितीतील चार घरे, एक मंदिर व ग्रामपंचायत कार्यालय इत्यादी वास्तूंना तडे गेले आहेत, तसेच गावातील अंतर्गत रस्ता सुमारे दीड फूट खचला आहे. मुख्य रस्ता दोन वर्षांपूर्वीच खचले असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात आले. वेळ पडल्यास या गावातील नागरिकांना स्थलांतरित करण्याबाबत व पर्यायी जागेत त्यांचे स्थलांतरित करण्याबाबत उपाययोजना सुरू केल्या आहेत. तालुक्यात पुन्हा दोन दिवस अतिवृष्टीचा इशारा दिल्याने सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## कर्जतमध्ये घराची भिंत कोसळली

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील क्रांतीनगर भागातील भागा जाधव यांच्या बंद असलेल्या घराची भिंत पावसामुळे कोसळली. याबाबत स्थानिक नागरिकांनी नगर परिषद प्रशसानाला कळविले आणि त्यांनतर आरोग्य विभागाचे पथक तेथे पोहचले आणि कोसळलेली भिंत बाजूला केली.

शहरातील क्रांतीनगर भागात अनेक लहान घरे असून त्यातील अनेक घरे ही बंद स्थितीत आहेत. त्यातील भागा जाधव यांचे लहानसे घर बंद असून त्या घराची एक भिंत ही कोसळली आणि त्यामुळे नगर परिषद स्वच्छता निरीक्षक सुदाम म्हसे यांनी आरोग्य सफाई कर्मचाऱ्यांना सोबत आणले. त्या सर्व कर्मचाऱ्यांनी कोसळलेली भिंत बाजूला केली आणि नुकसान कमी करण्याचा प्रयत्न केला.

## महाड नगर परिषदेच्या स्पर्धांचा निकाल जाहीर

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगर परिषद, श्रृंखला ऑर्गनायझेशन फोर सस्टनेबल डेव्हलपमेंट व रायगड जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने शहरामध्ये आयोजित आदर्श गृहिणी स्पर्धा व आदर्श गृहनिर्माण संस्था स्पर्धेच्या विजेत्यांची घोषणा मुख्याधिकारी महादेव रोडगे यांनी मंगळवारी (दि. २५) केली.

या स्पर्धेत शहरातील १०७ गृहनिर्माण संस्थांनी व ३४ महिलांनी सहभाग घेतला होता. प्रथम क्रमांक औदुंबर गृहनिर्माण संस्था गोमुखी आळी, द्वितीय निर्मिती निसर्ग उभामारुती काकरतळे आणि तृतीय सवित्री एनक्लेव प्रभात कॅलनी यांनी पटकाविला. मुख्याधिकारी महादेव रोडगे रायगड जिल्हा निर्माण संस्था फेडरेशनचे अध्यक्ष राजाराम पाटील शृंखला संस्थेच्या ममता मेहता, श्रीकृष्ण बाळ आदी उपस्थित होते.

आदर्श गृहिणी स्पर्धेत प्रत्येक वॉर्डमधून एक गृहिणी अशा पद्धतीने सात गृहिणींची निवड करण्यात आली. यामध्ये प्रभाग १ मंजिरी विठ्ठल जोशी, प्रभाग २ कविता विकास रोडे व विद्या कीरण देसाई, प्रभाग ३ उज्ज्वला भिमराव कोळेकर व साधना अनिल गांधी, प्रभाग ४ मेघना रंजित पवार, प्रभाग ५ श्रद्धा मकरंद जोशी, प्रभाग ७ रजनी प्रविण सुर्वे, प्रभाग ८ शारदा टक्के या विजेत्या म्हणून जाहीर करण्यात आल्या.

विजेत्यांना येत्या आठवड्यात पैठणी आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे, तर विजेता गृहनिर्माण संस्थांना मालमत्ता करात सूट देण्यात येणार आहे. शहरामध्ये स्वच्छता होण्याच्या दृष्टीने नागरिकांनीदेखील जागरूक असणे गरजेचे आहे. नागरिकांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने या स्पर्धांच्या आयोजन करण्यात आल्याचे या वेळी मुख्याधिकारी महादेव रोडगे यांनी सांगितले.

## ‘लोकाभिमुख योजना जनतेपर्यंत पोहचविणार’

**माणगाव : प्रतिनिधी**

केंद्र व राज्य सरकारच्या लोकाभिमुख योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहचवून त्यांना लाभ मिळवून देणार, असे भाजपच्या पंचायतराज व ग्रामविकास कोकण विभाग संयोजिका शर्मिला सत्वे यांनी म्हटले आहे.



प्रसिद्धी पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, २०१४पासून ते आजतागायत केंद्र व राज्य सरकारने जनकल्याणासाठी विविध लोकाभिमुख योजना अंमलात आणल्या आहेत. भारतीय जनता पक्ष २०१४मध्ये सत्तेवर आल्यावर त्यांनी जनहितासाठी पाऊल उचलले. म्हणूनच हा पक्ष २०१९मध्येही केंद्रात सत्तेवर आला, तसेच आता राज्यातही भाजप व मित्रपक्ष सत्तेत आहेत. भाजपची विचारधारा व काम करण्याची पद्धत पाहूनच भाजपला देशात चांगला प्रतिसाद जनतेचा मिळू लागला आहे. नुकताच आम्ही आमच्या नेत्यांच्या समवेत पंचायतराज व ग्रामविकास विभागामार्फत कोकणचा दौरा केला. या आमच्या दौऱ्याला सर्वत्र चांगला प्रतिसाद मिळाला. या दौऱ्यातून आम्ही भाजपची विचारधारा तसेच सरकारमार्फत अंमलात आणलेल्या विविध लोकाभिमुख योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला.

आगामी येणाऱ्या सर्वच निवडणुकांत निश्चितच याची फलश्रुती भाजप पक्षाला मिळून पुन्हा एकदा २०२४मध्ये भाजप केंद्र व राज्यात सत्तेवर येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

## पेणमध्ये गुणवंत विद्यार्थी, शिक्षकांचा सत्कार

**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटी सेवक सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. पतसंस्थेचे अध्यक्ष दिलीप पडळकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास ॲड. मंगेश नेने प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या वेळी उपाध्यक्ष डॉ. देविदास बामणे, सचिव प्रवीण काळे, संचालक बाळासाहेब ढाकणे सुशांत सुर्वे, चक्रधरदास शिंदे, सविता म्हात्रे, गीता म्हात्रे, स्वीकृत सदस्या कविता झेमसे, तज्ज्ञ संचालक भरत बागुल, शिवसजन कान्हेकर यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक सभासद उपस्थित होते. प्रारंभी इरसाळगडावरील मृतात्म्यांना तसेच सभासदांच्या मृत नातेवाईकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर वार्षिक सभेचे प्रास्ताविक उपाध्यक्ष डॉ. देविदास बामणे यांनी पतसंस्थेचा नफाचा आढावा सादर केले.

संस्थेचे अध्यक्ष मंगेश नेने यांना मिळालेल्या विविध पुरस्काराबद्दल पेण एज्युकेशन सोसायटी संस्थेच्या वतीने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला, तसेच शिष्यवृत्ती परीक्षा, दहावी, बारावी व इतर विभाग यामध्ये प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

पीएच.डी प्राप्त प्रा. डॉ. देविदास बामणे यांचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.




# दुर्घटनाग्रस्त इर्शाळवाडीला कर्जत नगर परिषदेतर्फे मदतीचा हात



**कर्जत : प्रतिनिधी**

खालापूर तालुका येथील दुर्घटनाग्रस्त इर्शाळवाडीस कर्जत नगरपरिषदेतर्फे मदत व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

दुर्घटनेची माहिती मुख्याधिकारी वैभव गारवे यांना मिळाल्यानंतर लगेचच नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, अग्निशमन जवान, सफाई कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी आवश्यक रेस्क्यू साहित्यासह रवाना झाले. मुख्याधिकरी वैभव गारवे, नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, नगरसेविका, नगरसेवक आणि कर्मचारी वर्ग उपस्थित होता.नगर परिषदेकडून १००, रोटरी क्लबकडून १५०, नगरसेवक नितीन सावंत यांच्याकडून १०० अशा एकूण ३५० चादरी व ब्लँकेट्स, नगर परिषदेकडून १० तर नगरसेवक नितिन सावंत यांच्याकडून १० अशा २० ताडपत्री, नगरसेवक संकेत भासे यांच्याकडून १० तर निलेश चौडिये यांच्याकडून दोन असे १२ टेंट, नगर परिषदेकडून ३० बॉक्स तर रोटरी क्लबकडून १६ असे ४६ बॉक्स पाणी बॉटल बॉक्स, नगर परिषदेकडून पाच बॉक्स तर रोटरी क्लबकडून १२ असे १७ बॉक्स बिस्कीट पुडे बॉक्स, नगर परिषदेकडून ११०, माजी नगरसेवक संतोष पाटील २० असे एकूण १३० रेनकोट, नगरसेवक नितीन सावंत यांच्याकडून २०० तर नगरसेवक सोमनाथ ठोंबरे २५० असे ४५० फूड पॅकेट, नगर परिषदेतर्फे चार टॉर्च, ३० फावडे, ३० घमेले, ३० टिकाव, ३५ ओडोमॉस क्रिम, ३०० मास्क, ३०० हॅन्ड ग्लोव्हज, चार लिटर निलगिरी तेल, तर या ठिकाणी काम करणारे १० मशीन ऑपरेटर्सची राहण्याची व खानपानाची व्यवस्था करण्यात आली.

४० डस्टबिन्स, ४० पायपुसणे, १५ बाथरुम, तात्पुरत्या निवारा ठिकाणी १५ टॉयलेट उपलब्ध करून देण्यात आले आहेत.


वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

| RFx No. | Description | Estimated Cost |
|---|---|---|
| Tend-13/ 23-24 **7000027444** | Supply of the 22kV PTs under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 3.81 Lakhs |
| Tend-16/ 23-24 **7000028007** | Supply of 36kV Breaker under EHV O&M Circle, Panvel. | Rs. 14.96 Lakhs |
| Tend-20/ 23-24 **7000028008** | Supply of 0.4 ACSR Zebra Conductor at EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 20.89 Lakhs |
| Tend-24/ 23-24 **7000028020** | Supply of 70KN & 120KN Disc insulator under EHV O&M Circle, Panvel. | Rs. 22.36 Lakhs |
| Tend-21/ 23-24 **7000028009** | Supply of 160KN Disc insulator under EHV O&M Circle, Panvel. | Rs. 14.96 Lakhs |

**EMD Minimum**: Rs. 5,000/- OR **EMD:** 1% of Estimated Cost. **Submission of Bids:** From 24.07.2023 to 01.08.2023 up to 23:59 Hrs **Opening Date:** 02.08.2023 @ 11:00 Hrs **Tender Fee:** Rs. 500/-+ GST each tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel. No. 022-27459624, Mob. No. 9167026131. e-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated Cost | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-16/23-24/ **RFx No. 7000027779** | Work of Providing 4 No. of Skilled (LDC Cum Computer Operator) at 400kV R.S. (O&M) Dn., Nagothane for the Financial Year 2023-24 **1st Extension** | Rs. 9,50,556/- | 01.08.23 up to 23:59 Hrs |

**EMD Fee** 1% of **Estimate Amount** & **Tender Fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** Mitesh Goyal (DY. EE) Mob No. 9461456635
e-mail ID: **ee7230@mahatransco.in**
**Note:** All eligible Suppliers/ Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीव्दारे कळविण्यात येते कि . खालील परिशिष्ट 'अ' मध्ये वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित धोकावडे, अलिबाग, रायगड. १. जनार्दन बाळू म्हात्रे २ रमेश बाळू म्हात्रे यांच्या मालकी हक्काची . तावेकब्जातील असुन आमचे पक्षकार यांनी सदर मिळकत कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले आहे. तरी सदर मिळकत ही मालकी हक्काबाबत खात्री करून घेणेकरीता प्रस्तुत जाहिर नोटिस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे :

**परिशिष्ट 'अ'**

मिळकत वर्णन

| मौजे | भूमापन क्र | एकूण क्षेत्र क्र | आकार रू/ पैसे |
|---|---|---|---|
| धोकावडे, अलिबाग, रायगड | ५५५/४ | ०.३५.१० | २.२४ |

प्राप्त परिस्थिती वरील परिशिष्ट 'अ' नमुद मिळकती मध्ये वा कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करारमदार. गहाण दान बक्षिस फरोक्त . तारण भाडेकरूपणाचा हक्क पोटगी समजोता करार. अखत्यारपत्र एम. ओ. यु वा तत्सम कोणतेही दावे . मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी व संबंधितांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत आपल्या हक्क हितसंबंधांचे स्वरूप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्ये पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येऊन भेटावे वरील कोणाकडुन काही लेखी हरकत तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असुन त्यावर कोणताही प्रकारचा दावा. हक्क हितसंबंध नाही असे समजुन आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदीचे काम सुरू करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपुर्वक सोडुन दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**दिनांक : २२/०७/२०२३**
**ठिकाण : पनवेल**

**सही/-**
**ॲड. कांचन एस. पाटील**
**बी.ए.एलएल.बी.**

**पत्ता :** २०१, साई आर्केड, जी. पी. पारसिक बँकेवरती, लाईफ लाईन हॉस्पीटलजवळ, पनवेल बस स्टॅन्ड समोर पनवेल, जि. रायगड. ४१० २०६.
फोन : ८६८९८०९८९६/८१०८८८२६११

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

| RFx No. | Description | Estimated Cost |
|---|---|---|
| Tend-25/ 23-24 **7000028025** | Providing outsourced 2 Nos. of Skilled Labour as LDC for HR Section at EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 4,15,724/- ( includign GST **EMD:** 5,000/- |

**Submission of Bids:** From 24.07.2023 to 31.07.2023 up to 23:59 Hrs **Opening Date:** 01.08.2023 @ 10:00 Hrs For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel. No. 022-27459624, Mob. No. 9769006131. e-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email :-mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167

**निविदा सूचना क्रमांक ४४ सन २०२३-२०२४**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो. ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५ २२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना दिनांक २५/०७/२०२३ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक ०१/०८/२०२३ रोजी १८.०० वाजे पर्यंत www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व दिनांक ०२/०८/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक ०२/०८/२०२३ रोजी ११.०० वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बागमांडला आंबेत विर टोळ रस्ता रा.मा. १०० कि.मी. १३/४०० मध्ये फाईन मारी व संरक्षक भिंतीची दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम २०२३-२४) | ९९९९०० | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | बागमांडला आंबेत विर टोळ रस्ता रा.मा. १०० कि.मी. १३/२०० मध्ये पाईप मारी व संरक्षक भिंतीची दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम २०२३-२४ ) | ८४३४०८ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | बागमांडला आंबेत विर टोळ रस्ता रा.मा. १०० कि.मी. १४/४०० मध्ये पाईप मारी व संरक्षक भिंतीची दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम २०२३ - २४) | ९४९३४७ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | बागमांडला आंबेत विर टोळ रस्ता रा.मा. १०० कि.मी. ००/३०० मध्ये पाईप मारी व संरक्षक भिंतीची दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम २०२३-२४) | ९९१४४७ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | बागमांडला आंबेत विर टोळ रस्ता रा.मा. १०० कि.मी. २/७०० मध्ये पाईप मारी व संरक्षक भिंतीची दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम २०२३-२४ ) | ९९५७६२ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | बागमांडला आंबेत विर टोळ रस्ता रा.मा. १०० कि.मी. ५/५०० मध्ये पाईप मारी व संरक्षक भिंतीची दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम २०२३-२४) | ९८७३०९ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | बागमांडला आंबेत विर टोळ रस्ता रा.मा. १०० कि.मी. ६/३०० मध्ये पाईप मारी व संरक्षक भिंतीची दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम २०२३-२४) | ९९९८४९ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | बागमांडला आंबेत विर टोळ रस्ता रा.मा. १०० कि.मी. ८/६०० मध्ये पाईप मारी व संरक्षक भिंतीची दुरूस्ती करणे. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम २०२३-२४) | ९९९८४६ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | मौजे नरवण बौध्दवाडी येथे सभामंडप बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (२२२५) | ६५३२४९ | ७००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | मौजे वराठी बौध्दवाडी येथे संरक्षक भिंत बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (२२२५) | ८१९८४२ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |

**टिप :-** १) तपशिलवार निविदा सुचना https//mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/३३८२
दिनांक : २२/०७/२०२३

विमाका/कोवि/२०२३-२०२४/११६

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# पनवेल परिसरात संसर्गजन्य रोगांची साथ

## बदलत्या वातावरणामुळे लहान मुलांना ताप, सर्दी, खोकला, जुलाब

**पनवेल : वार्ताहर**

जून महिन्यापासून शाळा सुरू झाल्या आणि त्यानंतर काही आठवड्यातच पावसानेही दमदार हजेरी लावली.परिणामी वातावरणात झालेला बदल, थंड वातावरण, पावसात भिजणे तसेच शाळेच एकत्र बसणे, डबा खाणे यामुळे संसर्ग वेगाने पसरुन सर्दी, खोकला, ताप तसेच जुलाबासारख्या तक्रारी घेऊन रुग्णालयाकडे धाव घेतली जात असल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली. पालकांनी घाबरुन न जाता वेळीच वैद्यकिय सल्ला घेण्याचे आवाहन शहरातील बालरोग तज्ज्ञांकडून केले जात आहे.

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये जलजन्य आणि किटकजन्य आजारांची झपाट्याने वाढ होते. पाऊस सुरू झाल्यावर हवेत निर्माण होणारा गारवा आणि पाऊस थांबल्यानंतर अचानक येणारे दमट आणि उष्ण हवामान या आजारांसाठी कारणीभूत ठरतात. लहान मुलांची प्रतिकारशक्ती कमी असल्याने त्यांना पावसाळ्यात चटकन संसर्ग होतो. त्यांच्या वायुमार्गाचा आकार कमी असल्याने श्वासनलिका लवकर प्रभावित होतात. यामुळेच पाच वर्षांच्या आतील बालकांना पावसाळ्याच्या दिवसांमध्ये संसर्गाचे प्रमाण अधिक असते.

खारघर येथील मदरहुड हॉस्पीटलचे बालरोग व नवजात शिशू तज्ञ डॉ. सुरेश बिराजदार सांगतात की , सध्या लहान मुलांमध्ये सर्दी, खोकला, ताप यांसारख्या विषाणूजन्य आजारांची लक्षणे आढळत आहेत. दर वर्षी पावसाळ्यात अशा प्रकारचे रुग्ण आढळतात. मात्र गेल्या दोन आठवड्यांपासून मुलांना जुलाब होत असल्याच्या तक्रारींचे प्रमाण वाढले आहे आणि गेल्या दोन महिन्याच्या तुलनेत जूनच्या तिसऱ्या आठवड्यापासून हे प्रमाण जवळपास ५० ते ७० टक्के वाढलं आहे.



पावसाळ्याच्या दिवसांमध्ये मुलांना गाळून, उकळून थंड केलेले पाणी द्यावे तसेच आपले मुल हायड्रेटेड राहिल याची काळजी घ्यावी. बाळाला जुलाब होत असल्यास द्रव पदार्थांचे सेवन वाढवून मुलांना हलका आहार द्यावा, लिंबू पाणी किंवा घरच्या घरी ओआरएस बनवून पाजावे. मऊ भात, खिचडी, दही भात असा हलका आहार द्यावा. बाळाच्या शौचाची जागा लालसर दिसत असेल तर त्याठिकाणी खोबऱ्याचे तेल, रॅश क्रिमचा वापर करावा. लहान मुलांमधील संसर्गाची लक्षणे अधिक काळ टिकून राहिल्यास अथवा पोटा दुखणे, शौचावाटे रक्त येण अशा काही समस्या दिसल्यास त्वरीत बालरोग तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

### अशी घ्या खबरदारी!

*पाणी उकळून प्यावे, शक्यतो घरातीलच अन्नपदार्थ खा. बाहेरचे अन्न टाळा, उबदार कपडे घालावे, गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळा, आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवा. विषाणूजन्य आजारांवर प्रतिजैविकांचा वापर करू नये. मुलांमध्ये 'ओव्हर' व 'काऊंटर' उपलब्ध असलेली खोकल्याची औषधे देऊ नये. आजारी व्यक्तीपासून मुलांना दूर ठेवावे. आपल्या मुलांपासून दुसऱ्या मुलांना संसर्ग होणार नाही, याची काळजी घ्यावी.*

डॉ. नरजोहन मेश्राम बालरोगअतिदक्षता विभागाचे प्रमुख, मेडिकवर हॉस्पिटल्स, नवी मुंबई सांगतात की, ज्या मुलांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत असते ती मुलं इतर मुलांच्या तुलनेत अधिक प्रमाणात हंगामी आजारांना बळी पडतात. पावसाळा हा विषाणुंच्या वाढीसाठी पोषक काळ मानला जातो म्हणून या दिवसात लहान मुलांची अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. लहान मुलांचे वेळोवेळी लसीकरण करणे हे त्यांना आजारांपासून दूर ठेवण्यास मदत करते. डायपरमुळे देखील पुरळ तसेच बुरशीजन्य संसर्ग वाढु शकतो त्यामुळे बाळाचे डायपर दर दोन ते तीन तासांनी बदलणे आवश्यक आहे. वेळोवेळी नखं कापावीत, खेळून आल्यावर स्वच्छ हात धुणे गरजेचे आहे. मुलांना वैयक्तीक स्वच्छतेचे महत्त्व पटवून द्यावे. दमा न्युमोनिय फ्लु यासारख्या आजारांचे प्रमाण पावसाळ्यात वाढते त्यामुळे पावसाळ्यापुर्वी वार्षिक इन्फ्लुएंझा लस घेणे गरजेचे आहे तसेच मुलांना न्युमोकोकल लस देण्यात यावी. ताप, जुलाब व उलट्या होत असल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता बालरोग तज्ज्ञांना भेट द्यावी.

# मोरबे धरण ७० टक्के भरले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आठवडाभर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मोरबे धरणाला मोठा दिलासा मिळाला आहे. नवी मुंबई महापालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणात ७० टक्के पाणीसाठा निर्माण झाला आहे. १८ जुलैपर्यंत मोरबे धरणात पडलेल्या पावसामुळे फक्त ४८ टक्के पाणीसाठा निर्माण झाला होता, मात्र १९ जुलैपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे सहा दिवसांमध्येच मोरबे धरणात तब्बल ७० टक्के पाणीसाठा वाढला आहे.

नवी मुंबई महापालिकेला मोरबे आणि एमआयडीसीच्या बारवी या दोन धरणातून पाणी पुरवठा होतो. यावर्षी पावसाला उशिराने सुरुवात झाल्यामुळे मोरबे धरणाने तळ गाठला होता. सर्व नवी मुंबईकरांचे पावसाकडे लक्ष लागून राहीले होते, परंतु प्रत्यक्षात २३ जूनपासून सलग पावसाला सुरुवात झाली. मोरबे धरणात पुरेसा पाणीसाठा निर्माण झाला नव्हता, मात्र रायगड जिल्ह्यात सलग सहा दिवस अतिवृष्टीसदृश पाऊस झाल्याने मोरबे धरणात माथेरान डोंगर रागांतून येणाऱ्या पाण्यामुळे तब्बल ७० टक्के पाणीसाठा निर्माण झाला.

### समाधानकारक पाऊस

**गेल्या सहा दिवसांमध्ये धरण क्षेत्रात ७०० एमएमपेक्षा जास्त पाऊस पडल्याची नोंद आहे. या पावसामुळे धरणात जुलै महिन्याचे काही दिवस आणि ऑगस्ट व सप्टेंबर असे पावसाचे दोन महिने जाणार आहेत. या काळात धरण क्षेत्रात समाधानकारक पाऊस पडल्यास मोरबे धरण वाहू लागेल, अशी अपेक्षा महापालिका प्रशासनाला आहे.**



# उरण केगाव येथे स्वच्छता जनजागृती रॅली

**उरण : रामप्रहर वृत्त**

विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्यविषयक जनजागृती, कौशल्य विकास उपक्रम आदिंना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या माध्यमातून सोमवारी (दि. २४) केगाव-उरण येथे स्वच्छता श्रमदान व जनजागृती रॅली हा कार्यक्रम जल्लोषात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षिका सोनिया पाटील यांच्या माध्यमातून स्वच्छतेची शपथही देण्यात आली.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्याभरात जे. एस. एस. रायगडच्या माध्यमातून विविध कौशल्य उपक्रम राबिवले जात असतांना 'कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत



सरकार' यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील २० वर्षांपासून सक्रिय पणे सुरू आहे.

स्वच्छता श्रमदान व जनजागृती रॅली कार्यक्रमावेळी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, प्रशिक्षिका वनिता म्हात्रे व सोनिया पाटील व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत स्वच्छता श्रमदान व जनजागृती रॅली हा कार्यक्रम उत्साहात झाला.

# दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन उपक्रमातील (एन.एम.एम.टी.) कायम कर्मचारी सेवेत असताना मृत पावले. अशा कर्मचाऱ्यांच्या वारसांना परिवहन उपक्रमाच्या सेवेत घेण्यात आले आहे. महापालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांचे हस्ते या वारसांना अनुकंपा तत्वावरची नियुक्तीपत्र देण्यात आली. यामध्ये दोन जणांना लिपीक टंकलेखक आणि ११ जणांना वाहक पदावर नियुक्त करण्यात आले आहे.

परिवहन उपक्रमाचे उपायुक्त तथा व्यवस्थापक योगेश कडूस्कर यांनी सांगितले की, १९९६ या वर्षापासून चालू



झालेल्या नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमांमध्ये आज मितीस ४२५ हुन अधिक बस दैनंदिन प्रवाशांच्या सेवेत आहेत. या बसच्या माध्यमातून ८० हून अधिक मार्गांवर अनुमाने तीन लाखांहून अधिक प्रवाशांना सेवा पुरवली जात आहे. या बस संचालनात संचलनातून प्रतिदिन सुमारे ४० लाख रुपये उत्पन्न परिवहनच्या तिजोरीमध्ये जमा होते. उपक्रमाचे कायम कर्मचारी सेवा बजावत असताना दुर्घटना घडल्यास अथवा अन्य कारणामुळे त्यांचा अपमृत्यू झाला आहे. शासन निर्णयानुसार वेळोवेळी अशा कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर कायम सेवेमध्ये घेण्यात आले आहे. त्यानुसार १९९६ पासून अद्यापपर्यंत १५ हून कर्मचाऱ्यांच्या वारसांना यापूर्वीच कायम सेवेमध्ये घेण्यात आले आहे.

यामध्ये वाहक, चालक, कारकून यांत्रिक या स्वरूपातील कर्मचाऱ्यांच्या वारसांचा समावेश आहे. त्याच धर्तीवर नुकतेच २०१६ नंतरच्या १३ कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर कायम सेवेमध्ये घेण्यात आले आहे. या प्रसंगी आयुक्त राजेश नार्वेकर यांनी सर्व उमेदवारांना शुभेच्छा देऊन नियुक्त पदावरील कर्तव्य आणि जबाबदरीचे काटेकोरपणे पालन करण्याची सूचना केली.

# जुईनगर भाजपतर्फे प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रे

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष जुईनगर विभागाच्या वतीने आणि नवी मुंबई मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने जुईनगर मधील सुशिक्षित, गरजू आणि बेरोजगारी महिला आणि युवती यांच्यासाठी फॅशन डिझायनर, ब्युटीशियन आणि शिवणकाम कोर्सेस प्रशिक्षण यशस्वीपणे जुईनगर येथील भाजप पक्ष कार्यालयात राबविण्यात आले.

हा कोर्सेस पूर्ण करण्यात असलेल्या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रे वाटप नवी मुंबई भाजप महामंत्री डॉ.



राजेश पाटील यांच्या हस्ते शिरवणे हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, नेरूळ येथे एका कार्यक्रमात प्रदान करण्यात आले.

या वेळी मार्गदर्शनपर बोलताना डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले की, नवी मुंबई मनपा विविध योजना शहरातील सुशिक्षित गरजू आणि बेरोजगारी महिला, युवती साठी राबवित असते. या योजना. केवळ कागदोपत्री न राहता याचा लाभ सामान्य महिलांना झाला पाहिजे म्हणुन त्याची अमलबजावणी आम्ही केली असल्याचा आनंद आहे. यातील प्रशिक्षणार्थी यांनी रोजगार कसा उपलब्ध होईल? त्यातून कुटुंबाला कसा आर्थिक हातभार लावला येईल हे पहिले पाहिजे, असे डॉ. पाटील यांनी सांगितले.

या वेळी कोर्सेस पूर्ण केलेल्या सुमारे ६५ जणींना डॉ राजेश पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. माजी नगरसेवक काशिनाथ पाटील यांसह मंगल बडे, प्रीतीत घोलपकर, नीलम वळवेकर, अंजना ताडे, दळवीताई यांचे मोलाचे योगदान लाभले.

# स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांना टी-शर्ट, छत्र्यांचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या वतीने महाराष्ट्राच्या कोर कमिटीची बैठक शासकीय निवासस्थान पनवेल येथे झाली. या बैठकीसाठी पक्षाचे अध्यक्ष सागर संसारे, पक्षाचे युवा नेते अनिकेत संसारे उपस्थित होते. यावेळी उपस्थित शेकडो कार्यकर्त्यांना टी शर्ट व छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष बाळाराम जाधव, मुंबई प्रदेशाध्यक्ष अमित हिरवे, पक्षाचे संघटक भगवान गरूड, मुंबईचे नेते विजय जाधव, महाराष्ट्र सचिव अशोक वाघमारे पक्षाचे नेते सुमित संसारे मराठवाड्याचे पक्षाचे नेते व नगरसेवक विजय साळवे अनेक मान्यवर नेत्यांसह महाराष्ट्रातून



अनेक जिल्ह्याचे व तालुक्याचे अध्यक्ष उपाध्यक्ष या बैठकीसाठी उपस्थित होते. या वेळी आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात पनवेलचे डॉ. गिरीश गुणे व उद्योगपती राहुल पाटील यांच्या हस्ते उपस्थित सर्व कार्यकर्त्यांना टी शर्ट व महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

# फणसवाडीतील आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय साहित्यवाटप

**पनवेल : वार्ताहर**

आपण सर्वजण समाजाचे काही देणे लागतो हा विचार घेऊन बँक ऑफ महाराष्ट्र, नवीन पनवेल शाखेत कार्यरत असलेले विशेष सहाय्यक अरविंद मोरे यांनी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फणसवाडी येथे आदिवासी विद्यार्थ्यांना शाळेचे दप्तर, वही, लिहिण्याचे साहित्य तसेच मिठाई देऊन साजरा केला.

या वेळी उत्सवमूर्ती अरविंद मोरे, प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे, प्रा. हिमांशू अरविंद मोरे, बँक ऑफ महाराष्ट्रच्या माजी शाखा प्रबंधक, प्रतिमा जाधव, संजीव सुदामे, प्रा. प्रज्ञा लातूरकर, प्रा. बिजली दडपे व शाळेच्या शिक्षिका नेहा मनोज गावंड व सविता राजाराम सरगर उपस्थित होत्या. कार्यक्रमात अरविंद मोरे म्हणाले की, आपण सर्वजण समाजाचे काही देणे लागतो ह्या भावनेनेच आज विद्यार्थांना शैक्षणिक साहित्य व मिठाई वाटून वाढदिवस आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा करत असल्याचे सांगितले. या वेळी त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन विद्यार्थ्यांनी बाळगावा ह्यासाठी प्रेरणादायी गोष्ट सांगून सर्वांचे लक्ष्य वेधले.

प्रास्ताविकात शिक्षिका सविता राजाराम सरगर यांनी बँक ऑफ महाराष्ट्र, नवीन पनवेल शाखेने खाते उघडण्यासाठी खूप मदत केल्याचे सांगितले. ह्यासाठी अरविंद मोरे यांचा पुढाकार प्रामुख्याने होता हे आवर्जून सांगितले. सुत्रसंचलन प्रा. प्रज्ञा लातूरकर यांनी केले. नेहा मनोज गावंड यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशश्वीतेकरिता सुभाष भोपी, संजय घुटुकडे व विजय घुटुकडे यांनी अथक परिश्रम घेतले.



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सामंजस्य करार

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात सोमवारी (दि. २४) सेंटर फॉर करिअर गायडन्स प्लेसमेंट अँड ट्रेनिंग व मायस्टुडिया, कॅनडा या दोन्ही संस्थेमध्ये सामाजिक करार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी मुख्य व्यवस्थापक कौशिक गांधी हे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट लिखित स्वरूपात एम.ओ.यू मधून दोन्ही संस्थेच्या ज्ञान व संसाधनांमध्ये आवश्यक योगदान देण्याची हमी देऊन करार हस्तांक्षरित करण्यात आला. या एम. ओ. यु. मधून महाविद्यालयातील सर्व शाखेतील परदेशात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना, काउन्सलिंग सेशन्स व वेगवेगळे ट्रेनिंग प्रोग्रॅम घेण्यात येतील, अशी हमी या वेळी दिली.

या कार्यक्रमांमध्ये प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड व सामंजस्य करार समितीच्या समन्वयक प्रा. नम्रता पारीक, प्रा. रेवन



शिंदे (समन्वयक, सेंटर फॉर करिअर गायडन्स, प्लेसमेंट अँड ट्रेनिंग) तसेच प्रा. महेश्वरी झिरपे (समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष) प्रा. योगिता पाटील, प्रा. डॉ. धनवी आवटे, प्रा. प्रतीक्षा पाटील हे उपस्थित होते.

## टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** वावंजे येथील सोना चांदी कंपनीच्या गेटवर लहू गोंधळी हा दारूच्या नशेत टेम्पो चालवत होता. त्याने सायकलवरून घरी जाणाऱ्या १९ वर्षीय आकाश पाटील याच्या सायकलला धडक दिली. सायकलवरून जाणाऱ्या १९ वर्षीय तरुणास धडक दिली. या धडकेत आकाश पाटील त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी लहूविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून इर्शाळवाडीतील गुरांवर उपचार

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी येथे राहत्या घरांवर दरड कोसळल्याने जवळपास ८४ आदिवासींना धिगाऱ्याखाली आपला जीव गमवावा लागला होता. नागरिकांच्या बरोबर पाळीव प्राणीही मृत्युमुखी पडले होते. तर काही जखमी झाले होते. त्यात गायी, बैल, वासरे व शेळ्या इत्यादींचा समावेश आहे. या जखमी गुरांना औषध उपचार करण्यासाठी उरण



तालुक्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे पथक इर्शाळ वाडी येथे पाळीव प्राण्यांना उपचार सेवा देण्यासाठी सक्रिय होते.

या वेळी रायगड जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. रत्नाकर काळे व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. श्यामराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पथकात काम करत असलेले पथक प्रमुख डॉ. सोमनाथ भोजने पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती उरण, चिरनेर येथील डॉ. संतोष डाबेराव, जासई येथील डॉ महेश सावंत, विंधणे येथील डॉ. महेश शिंदे उपस्थित होते.

या पथकाने इर्शाळवाडीतील पाच आजारी गुरांवर औषध उपचार केले. आजारी गुरांना सोबत नेलेला कडबा कुट्टी चारा उपलब्ध करून दिला. तसेच मृत झालेल्या गुरांचे पंचनामे केले. उरण तालुक्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या पशुैद्यकीय सेवेबद्दल आदिवासी बांधवांनी समाधान व्यक्त केले.

## निवडक

### तुपगावमध्ये सभागृहाची भिंत कोसळली

**खोपोली** : मुसळधार पावसामुळे तुपगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीतील वैश्यवाणी समाज सभागृहाची भिंत रात्री कोसळलेली असून सुदैवाने कोणी जखमी झाले नसले तरी वाहनांचे नुकसान झाले आहे. मुसळधार पावसामुळे सभागृहासमोरील भिंतीचा काही भाग खाली असलेल्या दुचाकी, चारचाकीवर कोसळला. मोठा आवाज झाल्याने आजूबाजूचे नागरिक धावत घटनास्थळी आले. नुकसानग्रस्त वाहन हलविण्यात आली आहेत. तलाठी तसेच तूपगावचे सरपंच रवींद्र कुंभार यांनी नागरिकांना सावधगिरी बाळगावी व रहदारी न करण्याचे सांगितले आहे.

### विद्यार्थ्यांना उपयुक्त पुस्तकांची भेट

**खोपोली** : खोपोली शहर शिवसेना व आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशनमार्फत नगर परिषदेच्या कै. र. वा. दिघे वाचनालय येथे एमपीएससी व यूपीएससी परीक्षाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक पुस्तकांचे वाटप करण्यात आले.



विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी कुठलीही गैरसोय होऊ नये व त्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे हाच एक मात्र उद्देश ठेवून पुस्तके देण्यात आल्याचे शहर प्रमुख संदीप पाटील यांनी सांगितले. या वेळी शहर संघटक तात्या रिठे, उपशहर संघटक दिनेश थोरवे, युवासेनेचे विवेक पाटील व अनुराग कोंडवले उपस्थित होते.

### संदीप वारगे यांना भारत विभूषण पुरस्कार

**अलिबाग** : नॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड, हरियाणा या संस्थेकडून



शैक्षणिक, सामाजिक उपक्रमातील गुणवत्तेच्या आधारे राष्ट्रीय भारत विभूषण सन्मान दरवर्षी दिला जातो. विविध क्षेत्रातील मान्यवरांना ३० पुरस्कार या संस्थेमार्फत दिले जातात. २०२२-२३या वर्षासाठी जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय मोहिमेत सहभागी करून घेणे, तसेच सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची गुणवत्ता पाहून राजिप आदर्श शिक्षक संदीप दत्तात्रेय वारगे यांना यावर्षीचा भारत विभूषण हा राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाली. हा पुरस्कार डिस्ट्रीक गव्हर्नर अमरचंद शर्मा यांच्या हस्ते अलिबाग येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### कशेळे येथे 'जेएसएस'तर्फे वृक्षारोपण



**कर्जत** : जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या माध्यमातून मंगळवारी (दि. २५) कशेळे येथे वृक्षारोपण व कौशल्य मार्गदर्शन कार्यक्रम झाला. कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे यांच्या माध्यमातून स्वच्छतेची शपथही देण्यात आली. या वेळी प्रशिक्षक विजय रणदिवे, ग्रामस्थ प्रतिनिधी नितेश सावंत व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# रायगडातील क्रीडा संकुल नूतनीकरण तातडीने पूर्ण करावे

## महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांचे निर्देश

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील तालुका व जिल्हा क्रीडा संकुलांचे नूतनीकरणासाठी निधी वितरित केला आहे. त्या संकुलांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी अधिकाऱ्यांना दिले. नवीन क्रीडा संकुल उभारणे आणि जुन्या क्रीडा संकुलाची देखभाल दुरुस्तीसाठी निधी कमी पडू देणार नसल्याचे क्रीडा व युवक सेवा मंत्री संजय बनसोडे यांनी या वेळी सांगितले.

रायगड जिल्ह्यातील प्रस्तावित विभागीय क्रीडा संकुल तसेच जिल्हा व तालुका क्रीडा संकुलांच्या सद्यस्थितीबाबत आढावा बैठकीचे मंगळवारी (दि. २५) आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मंत्री आदिती तटकरे बोलत होत्या.

क्रीडा संकुलासाठी निधी वितरित करणे तसेच, संबंधित कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना क्रीडा मंत्री बनसोडे यांनी दिल्या, तसेच मार्गदर्शक पदे व क्रीडा अधिकारी पदे भरण्याची प्रक्रिया सुरू असून करार पद्धतीने पदे भरण्याची प्रकिया जलद गतीने राबविण्याचेही त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, माणगाव, तळा, श्रीवर्धन, म्हसळा, रोहा येथील तालुका क्रीडा संकुलाच्या कामासाठी निधी मंजूर असून, संबंधित निविदा प्रकिया



गतीने राबवाव्यात. जिल्हाधिकाऱ्यांनी आतापर्यंत झालेल्या कामाचा अहवाल सादर करावा, तसेच कामे डिसेंबरपर्यंत तातडीने पूर्ण करावी. त्यानंतर पुढील कामांसाठी निधी वितरित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

क्रीडा संकुलासाठीच्या देखभाल निधीचा योग्य वापर करून राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंची प्रशिक्षक म्हणून निवड करावी. राज्यस्तरावर वास्तूविशारदांची नामिका सूची आहे, त्यांनाच विभागातील सल्लागार म्हणून नियुक्त करावे. क्रीडा संकुलात विविध क्रीडा प्रकाराच्या सोयी सुविधेसह, संरक्षक भिंत, अंतर्गत रस्ते, चेंजिंग रूम, जुनी इमारत दुरूस्ती, विद्युतीकरण, पाणी व्यवस्था या सुविधाही चांगल्या दर्जाच्या देणे गरजेचे असल्याचे मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

या बैठकीत क्रीडा विभागाचे सहसंचालक सुधीर मोरे, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे उपसचिव सुनील हंजे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

# सोलनपाडा धरणाचा सांडवा फोडून विसर्ग

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील सोलनपाडा येथील जामरुंग सोलनपाडा पाझर तलावाला गळती लागली होती. गळती काढण्याचे कामदेखील सुरू होते, मात्र धरणातील पाणी कमी करून धोका कमी करण्यासाठी जलसंधारण व लघु पाटबंधारे विभागाकडून सांडव्याचा एक भाग फोडून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

### पाणी गळतीचा धोका निवारणासाठी पाऊल



सोलनपाडा येथे राजिपच्या लघु पाटबंधारे विभागाकडून १९८० साली हे धरण बांधण्यात आले होते. गेले काही वर्ष सोलनपाडा पाझर तलावाला गळती सुरू असून २०१७पासून ग्रामस्थांना दरवर्षी पावसाळ्यात गावातून दोन दिवसांपुरते स्थलांतरित करण्यात येते. आता तात्पुरते स्थलांतर नको कायमची उपाययोजना हवी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

सोलनपाडा पाझर तलावाच्या पिचिंग केलेल्या भागात दुसऱ्या टप्प्यापासून पाण्याची गळती सुरू असल्याचे नितेश कडलक, पंढरीनाथ पिंपरकर व ग्रामस्थांनी लक्षात आणून दिले. त्यामुळे प्रशासनाने तत्काळ पाहणी केली व सुरक्षेचा उपाय म्हणून शुक्रवारी सोलनपाडा गावाला जवळच्या विजयभूमी युनिव्हर्सिटीमध्ये तात्पुरते स्थलांतरित केले, मात्र सारखे स्थलांतर आम्हांला नको आहे आम्हाला पर्यायी जागा शासनाने देऊन तिथे आमचे स्थलांतर करून पुनर्वसन करावे अशी आग्रही मागणी करीत ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत.

आमदार महेंद्र थोरवे, राजिप माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, तहसीलदार डॉ. शितल रसाळ, गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे, मृदू व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता ए. सी. कदम, लघु पाटबंधारे विभागाचे प्रभारी उपअभियंता सुजित धनगर, सरपंच दत्तात्रेय पिंपरकर, प्रमोद पिंगळे, अरुण हरपुडे, भास्कर देसले, रामदास घरत, ऋषिकेश राणे आदींनी ग्रामस्थांशी सोलनपाडा गणपती मंदिर येथे चर्चा केली. त्या वेळी मृदू व जलसंधारण विभागाचे अधिकारी व राजिप लघु पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी धरणातील पाणी कमी करून त्याचा धोका कमी केला जाऊ शकतो, असा सल्ला दिला. त्यावर एकमत होऊन आमदार व ग्रामस्थांनीदेखील दुजोरा दिला होता.

त्यानुसार सोलनपाडा पाझरतलावाच्या पूर्वीच्या दीड फुटी वॉल्वमधून धरणातून पाणी कमी करणे शक्य नसल्याने धरणाचा दोन फुटी वरचा सांडवा फोडून पाण्याची पातळी कमी करण्याचा मार्ग काढण्यात आला. त्यानुसार प्रशासनाकडून धरणाचा सांडव्याचा वरचा भाग हॅन्ड ब्रेकरच्या सहाय्याने फोडून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

# माशांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोची दुचाकीला धडक

## कुसुंबळे येथील अपघातात दोघे जागीच ठार

**अलिबाग : प्रतिनिधी**

माशांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोने दुचाकीला धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात दुचाकीवरील पुरुष व महिला जागीच ठार झाले. आरती भारत पाटील (वय ४०) व हिराचंद्र दत्तू म्हात्रे (वय ५०) अशी मृतांची नावे आहेत. पेझारी-नागोठणे मार्गावर कुसुंबळे गावच्या हद्दीत मंगळवारी (दि. २५) सकाळी हा अपघात घडला.



माशांची वाहतूक करणारा टेम्पो (एमएच ०६ बीडब्ल्यू ६३२०) भरधाव वेगाने नागोठण्याच्या दिशेने जात होता. टेम्पो कुसुंबळे गावच्या हद्दीत कातळपाडा येथे आला असता चालकाचा टेम्पोवरील ताबा सुटला. त्यामुळे टेम्पोने समोरून येणाऱ्या दुचाकीला (एमएच ०६/९७२६) धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील आरती पाटील व हिराचंद्र म्हात्रे या दोघांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर टेम्पो रस्त्यावरच आडवा झाल्यामुळे वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

अपघाताची माहिती मिळताच शिवसेना जिल्हा प्रमुख राजा केणी यांनी अपघातग्रस्तांना मदत केली. पोयनाड सहाय्यक पोलीस निरीक्षक बेलदार, सर्के, लवटे, वाहतूक पोलीस हवालदार पवार हेदेखील घटनास्थळी पोहचले. त्यांनी वाहतूक सुरळीत सुरू केली.

# कर्जतधील २७२ शाळांमध्ये चला झाडे लावूया अभियान



**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये वसुंधरा बचाव आणि पर्यावरण संवर्धन अभियान सुरू करण्यात आले आहे. त्या माध्यामातून तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २७२ शाळांमध्ये चला झाडे लावूया, हे अभियान राबविण्यात सुरुवात झाली आहे. पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी संतोष दौंड यांच्या पुढाकाराने आणि संकल्पनेतून हे अभियान राबविण्यात सुरुवात झाली आहे.

तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेच्या २७२ शाळा असून या सर्व शाळांच्या आवारात पिंपळ आणि वड ही वृक्ष लावून त्यांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन आणि आपली वसुंधरा बचाव ही दोन्ही उद्दिष्टे यशस्वी होणार आहेत.

हे लक्षात घेऊन तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये चला झाडे लावूया हे अभियान सुरू झाले. तालुका पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी संतोष दौंड यांच्या संकल्पनेतून चला झाडे लावूया ऑक्सिजन वाढवूया या नवीन उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या अभियानासाठी नालासोपारा येथील सामाजिक बांधिलकी या संस्थेने सर्व झाडे उपलब्ध करून दिली आहेत.

या उपक्रमाची सुरुवात जिल्हा परिषद शाळा सुगवे येथे रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांच्या हस्ते वड आणि पिंपळ या पवित्र वृक्षांची लागवड करून झाली. या वेळी जिल्हा उपशिक्षणाधिकारी भोपळे, कर्जत तालुका पंचायत समितीचे गटशिक्षण आधिकारी संतोष दौंड, सर्व केंद्राचे केंद्रप्रमुख, गटसाधन केंद्रातील सर्व साधन व्यक्ती, सर्व शाळांचे मुख्याध्यापक आणि शिक्षक उपस्थित होते.

# होमगार्ड महिलांच्या हुशारीमुळे रोख रकमेची पिशवी शोधण्यात यश

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील मुख्य बाजारपेठ येथे नागरिकांच्या सुरक्षेसाठी आपली दुटी बजवत असताना होमगार्ड फखरुन्निसा अ. रहेमान वावेकर, सुचिता सुंदर कवळे, मनोरंजना शंकर दिवेकर यांनी नारायण कृष्णा नांदगावकर यांची एक लाख रोख रक्कम असलेली हरवलेली पिशवी शोधून दिल्याने त्यांच्या हुशारीचा व प्रामाणिकपणाचे कौतुक होत आहे.

दत्तवाडी येथील माजी शिक्षक नारायण कृष्णा दिवेकर हे आपले पैसे काढण्यासाठी शहरातील बाजारपेठ येथील बँकेतून रोख एक लाख रुपये काढून रॉयल स्वीट मार्ट येथे खरेदीसाठी आले असता आपली गाडी समजून रोख रक्कम असलेली पिशवी अनोळख्या गाडीला लावली आणि दुसरीकडे खरेदीकरिता पायी पुढे गेले. खरेदी करून आल्यानंतर आपल्या गाडीला लावलेली पिशवी न दिसल्याने नांदगावकर हे घाबरले. त्या ठिकाणी असणाऱ्या तीन होमगार्ड महिलांना त्यांनी नांदगावकर यांना धीर दिला व वेळ न घालवता पोलीस स्टेशन गाठले. पोलिसांना सांगितल्यानंतर तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले. त्यात दिसणाऱ्या गाडीचा नंबर घेऊन शिघ्रे येथील गाडी मालकाच्या घरी जाऊन यासंदर्भात कल्पना दिली. त्यांनी आपल्या गाडीला लावलेली रोख रक्कमची असलेली पिशवी होमगार्डच्या ताब्यात दिली. महिला होमगार्डनी नारायण नांदगावकर यांना पिशवी ताब्यात दिली. या तिघांचा धाडसीपणा व प्रामाणिकपणाचा सर्वंच स्थांरावर कौतुक होत आहे.

## अभिनंदन!



**माणगाव : खासदार सुनील तटकरे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी, तर आदिती तटकरे यांची राज्याच्या मंत्रिमंडळात महिला व बालकल्याण कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल आढावा बैठकीत त्यांचे माजी नगराध्यक्ष आनंदशेठ यादव, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष नितीन वाढवळ, माजी उपनगराध्यक्ष दिलीप जाधव, तालुका राष्ट्रवादी उपाध्यक्ष गणेश चव्हाण यांनी अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.** (छाया : सलीम शेख)

# शेतीकामांसाठी सर्जा-राजाची जोडी भारी!

**पाली : प्रतिनिधी**

सध्या बळीराजा शेतीच्या कामात गुंतला आहे. ट्रॅक्टर व इतर यांत्रिक साधनांच्या तुलनेत जिल्ह्यातील अनेक शेतकरी अजूनही शेतीच्या कामासाठी बैलांच्या नांगराला पसंती देत आहे. जमिनीत खोलवर जाणारा नांगराचा फाळ, छोट्या व तुकड्यांच्या शेतासाठी उपयुक्त आणि बैलाला देण्यात आलेले महत्त्व यामुळे अजूनही बहुतांश शेतकरी नांगराचा वापर करीत आहेत.

पावसाने हजेरी लावली आणि पेरणीसाठी जमीन नागंरणीला सुरुवात झाली. शिवाय आता भात रोपे तरारली असून लावणीची कामे जोरात सुरू झाली आहेत. जिल्ह्यातील भात शेती ही तुकड्यांमध्ये विभागली आहे, तसेच डोंगर उताराला लागून असलेली व दुर्गम आणि दुरच्या पल्ल्यातील



(छाया : धम्मशील सावंत)

शेती तसेच शेताभोवती असलेले बांध यामुळे तेथे ट्रॅक्टर नेणे व नांगरणी करणे गैरसोयीचे होते, मात्र नांगर व बैल कुठेही सहज नेले जाऊ शकतात.

बैल नांगराचा फाळ जमिनीत खोलवर जाऊन जमीन अधिक भुसभूशीत करतो. त्यामुळे पेरणी करणे सोपे जाते. शेतात बैलाचे पाय पडणे हे अनेकांना शुभ वाटते. तसेच बैलाच्या पायामुळे तण व गवत मरतात. यामुळे काही शेतकरी पेरणी व लावणीच्या दरम्यानच्या नांगरणीला बैलांच्या नांगराला पसंती देतात.

**दरवर्षी शेतीसाठी बैलांच्या नांगरालाच पसंती देतो. ट्रॅक्टरपेक्षा नांगराने चांगली नांगरणी होते. बैलाच्या पायामुळे गवत व तण मरतात. शिवाय बैलाला आपल्या संस्कृतीत महत्व आहे, मात्र नांगर हल्ली फारसे मिळत नाहीत. मजुरीही वाढली आहे.**

**-निलेश शिर्के, शेतकरी, पुई-सुधागड**

नांगरणी करणाऱ्या शेतकऱ्यांस किंवा मजुरांना नांगऱ्या म्हणतात. काही शेतकरी स्वतः आपल्या शेतात नांगरणी करतात, तर काही जण नांगऱ्याला बोलवितात. एक बैलजोडी व नांगरासह नांगऱ्याची मजुरी ७०० ते १००० रु. प्रती दिवस आहे. जर पैसे नाही घेतले, तर त्या बदल्यात नांगऱ्याकडे काम करण्यासाठी तीन-चार माणसे द्यावी लागतात, असा हा व्यवहार असतो. नांगऱ्याला मजुरी बरोबरच एक वेळची न्याहरी, जेवण व दोन वेळेचा चहापाणी दयावे लागते, तरीदेखील या नांगऱ्याला खूप मागणी आहे.

# किसान सन्मान निधी योजनेंतर्गत १४व्या हप्त्याचे उद्या वितरण

**अलिबाग** : केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र लाभार्थींना अदा करावयाच्या १४व्या हप्त्याचे वितरण गुरुवारी (दि. २७) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वितरण करण्यात येणार आहे. या लाभ वितरण कार्यक्रमामध्ये पात्र लाभार्थी https://pmevents.ncog.gov.in या व्हीसी लिंकद्वारे सहभागी होऊ शकतात.

पात्र लाभार्थ्यांना १४ व्या हप्त्याचा लाभ मिळण्यासाठी ई-केवायसी प्रामाणिकरण व बँकखाते आधार संलग्न करणे अनिवार्य आहे. ज्या पात्र लाभार्थ्यांनी ई-केवायसी प्रमाणिकरण किंवा त्यांचे बँक खाते आधार संलग्न केले नसेल त्यांनी त्वरित नजिकच्या सीएससी केंद्रासोबत संपर्क साधून ई-केवायसी प्रमाणिकरण व संबंधित बँकेला भेट देऊन बँकखाते आधार संलग्न करून घ्यावे. ई-केवायसी प्रामाणिकरण व बँकखाते आधार संलग्न झाले नसल्यास पात्र लाभार्थींनासुद्धा १४ व्या हप्त्याचा लाभ मिळणार नाही.

# पेणमध्ये महिलांची आरोग्य तपासणी

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या वाढदिवसानिमित्त शिबिर




(छाया : इजाज मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप पेण-सुधागड-रोहा विधानसभा प्रभारी प्रसाद भोईर यांच्यातर्फे महिलांकरिता विशेष आरोग्य मार्गदर्शन व तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

शिहू येथे ग्रामपंचायत कार्यालय हॉल येथे परिसरातील महिलांसाठी प्रसाददादा मित्रमंडळ पेण, भारतीय जनता पक्ष पेण व प्रयास हॉस्पिटल कार्लेखिंड यांच्या संयुक्त विद्यमाने महिला विशेष आरोग्य मार्गदर्शन शिबिर व तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराचा शिहू, चोळे, बेणसे परिसरातील शेकडो महिलांनी लाभ घेतला. या वेळी सरपंच पल्लवी भोईर, पेण पंचायत समिती माजी सभापती मनिषा भोईर, डॉ. रेखा म्हात्रे, डॉ. रिद्धी म्हात्रे, सदस्य, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पावसामुळे दुसरी कसोटी अनिर्णित

**त्रिनिनाद : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दोन सामन्यांच्या मालिकेतील दुसर्‍या कसोटीत पावसाचा अडथळा कायम राहिला. त्यामुळे पंचांनी पाचव्या दिवसाचा खेळ रद्द करण्याचा निर्णय घेतला. अशा प्रकारे दुसरी कसोटी अनिर्णित राहिली आणि भारताने विंडीजवर १-०ने मालिका विजय नोंदवला.

पोर्ट ऑफ स्पेनमधील क्वीन्स पार्क ओव्हल येथील कसोटी सामन्याच्या पाचव्या दिवसाचा खेळ पावसामुळे पूर्णपणे वाहून गेला. एकही चेंडू टाकता आला नाही. रविवारीही पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे पाचव्या दिवशी सामना अर्धा तास आधी नियोजित करण्यात आला होता. या कसोटीत भारताने वेस्ट इंडिजसमोर ३६५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. रविवारचा खेळ संपला तेव्हा वेस्ट इंडिजच्या २ बाद ७६ धावा झाल्या होत्या. पाचव्या आणि शेवटच्या दिवशी त्याला २८९ धावांची गरज होती. त्याचवेळी भारताला विजयासाठी आठ विकेट्सची गरज होती, मात्र पुढे खेळ होऊ शकला नाही. अशा स्थितीत भारताला १-०वर समाधान मानावे लागले.

भारताने पहिल्या डावात ४३८ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात वेस्ट इंडिजचा पहिला डाव २५५ धावांवर आटोपला. त्यामुळे टीम इंडियाला १८३ धावांची आघाडी मिळाली. भारताने दुसरा डाव २ बाद १८१ धावा करून घोषित केला आणि एकूण ३६४ धावांची आघाडी घेतली होती. पाचव्या दिवशी पावसाने कहर केला. सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता सुरू होणार होता, पण तेव्हापासून मुसळधार पाऊस पडत होता. रात्री ९.३०च्या सुमारास दुपारचे जेवण घेण्यात आले. तोपर्यंत पाऊस थांबला होता आणि कव्हर्स काढली होती. सामना सुरू होणार तेवढ्यात पुन्हा पावसाने हजेरी लावली आणि खेळपट्टी पुन्हा कव्हर्सने झाकली गेली. यादरम्यान अनेकवेळा पावसाचा हा लपंडाव सुरु होता. असे अनेकवेळा घडले की, कव्हर काढले गेले आणि लगेचच पाऊस सुरू झाला. अशा स्थितीत रात्री उशिरापर्यंत प्रतीक्षा केल्यानंतर अंपायर्सनी पाचव्या दिवसाचा खेळ रद्द करण्याचा निर्णय घेतला. मोहम्मद सिराजला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला आणि रविचंद्रन अश्विन, यशस्वी जैस्वालला सामन्याचे मानकरी म्हणून घोषित करण्यात आले.

## टीम इंडियाने मालिका जिंकली




## आता वनडे लढतींचा थरार

भारताने डॉमिनिका येथील पहिली कसोटी एक डाव आणि १४१ धावांनी जिंकली होती. त्यामुळे ही मालिका टीम इंडियाने १-० अशी जिंकली. आता भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात तीन सामन्यांची वन डे मालिका होणार आहे. या मालिकेतील पहिला सामना २७ जुलै रोजी बार्बाडोस येथे होणार आहे.

# किकबॉक्सिंग स्पर्धेत पेणच्या खेळाडूंचे यश



**पेण : प्रतिनिधी**

रायगड किकबॉक्सिंग असोसिएशनने पनवेलजवळील सुकापूर येथील लक्ष्मी पब्लिक स्कूलमध्ये जिल्हास्तरीय किकबॉक्सिंग निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत पेण येथील खेळाडूंनी यश प्राप्त करीत मेडल पटकावून पेण तालुक्याला तृतीय क्रमांकाची चॅम्पियनशिप मिळवून दिली.

पेणमधील नैतिक पाटील, रजित पाटील, रोहन पाटील, जीवेश पाटील, अनुज बलदेवसिंग लिंगवल, रितेश ठाकूर, सार्थक ठाकूर, वंश घरत, प्रिन्स पाटील, आयुष पाटील, वेदांत पाटील, उत्तरा विनायक पाटील, अर्पिता घरत यांनी सुवर्ण; मोहसीन मिनहाज अनसारी, गौरव लटपटे, भावेश पाटील, मंथन ठाकूर, शिवम पाटील, ऋतुराज घरत, रोनक पाटील, रुद्र पाटील, स्पर्श पाटील, पार्थ पाटील, उन्मुक्त पाटील, श्रेया विशाल सुरते, समृद्धी चेतन पिंगळे यांनी रौप्यपदक, तर संतोष गोळे, जान्हवी विनायक पाटील, कृपा म्हात्रे, रचिता गावंड या खेळाडूंनी कांस्यपदक पटकाविले.

यशस्वी खेळाडूंना रवींद्र म्हात्रे, प्रथमेश मोकल, विनायक पाटील तसेच आयुष रसाळ यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व खेळाडूंची बारामती येथे होणार्‍या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

स्पर्धेवेळी महाराष्ट्र किकबॉक्सिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष तथा रायगड अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर यांनी पेणच्या प्रथमेश मोकल याची जिल्हा किकबॉक्सिंग असोसिएशनच्या सचिवपदी नियुकी केल्याचे घोषित केले व त्याला पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धा प्रशांत घांगुर्डे, निलेश भोसले, चिंतामणी मोकल, प्रतीक करांडे यांच्या मार्गदर्शनखाली झाली.

# महाराष्ट्र राज्य कॅरम असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी गिरीष तुळपुळे बिनविरोध

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीष तुळपुळे यांची महाराष्ट्र राज्य कॅरम असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली, तर रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे सचिव दीपक साळवी यांची शासकीय परिषदेवर सदस्य म्हणून निवड करण्यात आली.



महाराष्ट्र कॅरम असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच मुंबईतील दादर क्लब येथे घेण्यात आली. या सभेत चौवार्षिक निवडणूक पार पडली. २०२३ ते २०२७ या कालावधीसाठी या वेळी निवडणूक घेण्यात आली. पुढील चार वर्षांसाठी ही कार्यकारिणी कार्यरत असणार आहे. गिरीश तुळपुळे व दीपक साळवी यांची अनुक्रमे उपाध्यक्ष व शासकीय परिषद सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, सदस्य व खेळाडूंनी दोघांचे अभिनंदन केले.

## आयसीसी क्रमवारीत हरमनप्रीतची घसरण

**दुबई** : भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरला आयसीसी क्रमवारीत दोन स्थानांचे नुकसान झाले आहे. ती आता सहाव्या स्थानावरून आठव्या स्थानावर घसरली. दुसरीकडे मंधानाला एका स्थानाचा फायदा झाला असून ती सातव्या स्थानावरून सहाव्या स्थानावर आली आहे.




# महिला विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत जर्मनीकडून मोरोक्कोचा धुव्वा

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

जर्मनीच्या संघाने यंदाच्या महिला विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील सर्वांत मोठ्या विजयाची नोंद करताना मोरोक्कोचा ६-० असा धुव्वा उडवला. दोन वेळचा विजेता संघ जर्मनी आणि महिला विश्वचषकात पदार्पण करणारा मोरोक्कोचा संघ यांच्यातील तफावत या लढतीत दिसली.

जर्मनीचे आक्रमण रोखण्यात मोरोक्कोला अपयश आले. जर्मनीने ७५ टक्के वेळ चेंडू आपल्याकडे राखला आणि गोलच्या दिशेने १६ फटके मारले. पूर्वार्धात आघाडीपटू अलेक्सांड्रा पॉपने (११ आणि ३९व्या मिनिटाला) दोन गोल नोंदवत जर्मनीला भक्कम आघाडी मिळवून दिली. उत्तरार्धातही जर्मनीने आपल्या आक्रमणाची गती कायम राखली. ४६व्या मिनिटाला क्लारा बुएलने जर्मनीचा तिसरा गोल केला. यानंतर मोरोक्कोच्या एल हाज (५४व्या मि.) आणि यास्मिन मरबेत (७९व्या मि.) यांच्याकडून झालेल्या स्वयंगोलमुळे जर्मनीला ५-० अशी आघाडी मिळाली. अखेरीस ९०व्या मिनिटाला लिया शुलेरने गोल करीत जर्मनीला ६-० असा विजय मिळवून दिला.


दुसरीकडे इटलीने विश्वचषकातील मोहिमेची यशस्वी सुरुवात करताना अर्जेंटिनाला १-० असे पराभूत केले. इटलीकडून ख्रिस्टियाना गिरेलीने ८७व्या मिनिटाला निर्णायक गोल नोंदवला. त्यामुळे अर्जेंटिनाला महिला विश्वचषकात आजवर खेळलेल्या १० सामन्यांत आठवा पराभव पत्करावा लागला, तर अरी बोर्गेसच्या हॅट्ट्रिकच्या बळावर ब्राझीलने पनामाचा ४-० असा पराभव केला.










| दिनांक | कार्यक्रम |
|---|---|
| २६/०७/२०२३ (बुधवार) सायं. ७ ते ९ | विश्वंभर भजन मंडळ गव्हाण, बुवा श्री. रविराज कोळी, पखवाज :- श्री. प्रशांत कोळी. |
| २७/०७/२०२३ (गुरुवार) सायं. ७ ते ९ | राधाकृष्ण भजन मंडळ शिवाजीनगर, बुवा :- श्री. रसिकलाल कानडा, तबला :- कु. ऋतुजा कानडा. |
| २८/०७/२०२३ (शुक्रवार) सायं. ७ ते ९ | श्री गावदेवी भजन मंडळ न्हावा, बुवा :- श्री. महेश पाटील, पखवाज :-श्री. महादेव ठाकुर. |
| २९/०७/२०२३ (शनिवार) सायं. ७ ते ९ | आदिशक्ती प्रासादिक महिला भजन मंडळ बोरखार, बुवा :- प्रगती श्रीकांत डाकी, पखवाज :- गुरुवर्य श्री. सुहास ठाकूर. |
| ३०/०७/२०२३ (रविवार) | दशक्रिया विधी |
| ३१/०७/२०२३ (सोमवार) सायं. ७ ते ९ | विश्वनाथ बुवा संगीत विद्यालय दिघोडे प्रस्तुत 'भक्तीधारा', गुरुवर्य :- श्री.सुहास ठाकूर सर (धुतूम), गायक :- मृणाली ठाकुर, संचाली पाटील, प्रगती डाकी, प्रियांशी डाकी, पुजा म्हात्रे, पखवाज:- आयुष म्हात्रे, तबला :- विनित ठाकूर, |
| ०१/०८/२०२३ (मंगळवार) सायं. ७ ते ९ | श्री गुरुकृपा भजन मंडळ, कोपर, बुवा -सौ. सुप्रिया समीर घरत, पखवाज-श्री. तुषार घरत, तबला -कु. मिलींद कडू, टाळ -कु. उमेश गावंड. |

शोकाकुल :- समस्त ठाकूर परीवार व आप्तेष्ठ

पत्ता: मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com